salaamchaus

यश शास्त्र

यशस्वी होण्याचे नैसर्गिक नियम

अब्दुस्-सलाम चाऊस

नुकत्याच पार पडलेल्या
बिजिंग ऑलिम्पिक्समधे
चीनला शंभर पदके मिळाली,

भारताला तीन,

आणि अमेरिकेच्या एकट्या
मायकल फेल्प्सला
आठ सुवर्णपदके –

हे योगायोगाने नाही.

माणसं योगायोगाने,
नशिबाने,
किंवा अपघाताने यशस्वी होत नाहीत.

प्रस्तुत आहे.....

यश हा अपघात नाही. किंवा चमत्कारही नाही.

1 प्रस्तावना 15
2 निश्चित ध्येय 29
3 इच्छा 43
4 विचार 51
5 दृष्टिकोन 59
6 विश्वास 67
7 कृती 75
8 मेहनत 89
9 चिकाटी 101
10 भीती 109
11 अपयश 115
12 अनिश्चय 123
13 सवय 131
14 यश 135
15 देणे 149
16 स्वत:मधेच आहे उत्तर 179
17 संधी 187
18 वेळ 197
19 काही विचार...विचार करण्यासाठी 211
20 आता कामाला लागा 219

तुम्ही जे आत्तापर्यंत करत होते तेच पुन्हा कराल तर तुम्हाला तेच मिळेल जे आत्तापर्यंत मिळत होतं.

आधी कधीच न मिळवलेलं मिळवण्यासाठी
आधी कधीच न केलेलं करावं लागेल.

यशस्वी होण्याच्या नैसर्गिक नियमांचं हे पुस्तक आहे.

यशाचे नियम शंभर टक्के नि:पक्षपाती आहेत. त्यांना भावना नाहीत. एवढंच काय त्यांना याची पर्वा नाही की कोण यशस्वी होतोय आणि कोण अपयशी, कोण श्रीमंत होतोय आणि कोण गरीब, कोण पास होतोय आणि कोण नापास.

शिवाय या नियमांचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे त्यांना कोणीही वापरू शकतो, कोणीही अमलात आणू शकतो, आणि यशस्वी होऊ शकतो.

यशस्वी लोक म्हणजे आपल्यासारखीच माणसं.

आजच्या युगात यशस्वी न होण्यासाठी कुठलंही कारण नाही. जगामधे असे हजारो लोक आहेत ज्यांना तुमच्यापेक्षा जास्त अडचणींना, तुमच्यापेक्षा जास्त हलाखीच्या परिस्थितींना तोंड द्यावं लागलं ज्याची कल्पनाही करणं कठीण आहे. तरीही ते लोक सर्व प्रतिकूल परिस्थितींवर मात करीत पुढे निघून गेले.

एखाद्याचं प्रचंड यश पाहून आपण बऱ्याचदा इतके प्रभावित होतो की ती व्यक्ती कशा कशा परिस्थितींना किंवा अडचणींना किंवा अपयशांना हाताळत त्या यशापर्यंत पोहोचली असेल याचा आपल्याला किती

वेळा विचारही येत नाही.

जगावर राज्य करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या नेपोलियनचे नाव ऐकल्यावर तो एके काळी नोकरीच्या शोधात गल्लोगल्ली, उपाशीपोटी भटकणारा सामान्य तरुण असेल यावर विश्वास बसत नाही.

आज एका देशातून दुसऱ्या देशात किंवा एका खंडातून दुसऱ्या खंडात थेट विमाने उडतात. पण ओरविल राइट जो उडणारा पहिला माणूस होता त्याच्या पहिल्या उड्डाणात त्याच्या विमानाने शंभर फूट अंतर कापलं होतं.

खरं तर 'अंतर कापलं' हा शब्दप्रयोगही घटनेचे अचूक वर्णन करणारा नाही. असं म्हणता येईल की जिथून त्या यंत्राने हवेत झेप घेतली आणि जिथे येऊन आदळलं त्या दोन ठिकाणांमधलं अंतर शंभर फूट होतं.

किती वेळा ही समजूत माणसाला यशापासून दूर ठेवते की जे लोक यशस्वी होत आहेत ते आपल्यापेक्षा जास्त हुशार आहेत. तसं काहीच नाही. कोणीच तुमच्यापेक्षा हुशार नाही.

मॅकिअवेली नामक एक इटॅलियन मुत्सद्दी होता ज्याने म्हटलं - 'सर्व माणसे सारख्या पद्धतीने जन्माला

येतात, सारख्या पद्धतीने जीवनावश्यक गरजा पूर्ण करतात, सारख्याच पद्धतीने मरतात'.

यशस्वी होण्याची तीव्र इच्छा असलेला कुठलाही माणूस या पुस्तकातून जाईल, या पुस्तकाचा अभ्यास करेल आणि त्याला काही फायदा होणार नाही हे अशक्य आहे.

जे तुम्ही या पुस्तकात शिकणार आहात ते तुमच्या जीवनाला नवीन वळण देऊ शकतं. तुमच्या जीवनात क्रांती घडवू शकतं.

या सर्व नियमांना आणि गोष्टींना समजून आणि त्यांना कृतीमध्ये उतरवून जी काही तुमच्या जीवनातील वाजवी ध्येये आहेत ती तुम्ही मिळवू शकता. कोणीही तुम्हाला त्यापासून रोखण्यास असमर्थ राहील. शुद्ध असमर्थ.

माणसाची एक शोकांतिका म्हणजे माणूस निसर्गाचे नियम बदलण्यासाठी शुद्ध असमर्थ आहे. जेव्हाही माणसाने या दिशेने प्रयत्न केले माणसाने आपटी खाल्ली.

उदाहरणार्थ निसर्गाचा नियम सांगतो की आधी पेरावं लागतं आणि नंतर उगवतं. एखादा माणूस या

नियमाच्या उलट करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्या माणसाला काय मिळेल तुम्हीच विचार करा.

पण खरं तर ही शोकांतिका नाही. कारण हीच तर गोष्ट आहे जी माणसाला यशाची गॅरन्टी देते. निसर्गाचे नि:पक्षपाती नियम हे निश्चित करतात की कोणीही यशस्वी होऊ शकतो.

या पुस्तकात सांगितलेल्या गोष्टी कुठल्या विशिष्ट काळाशी संबंधित नाहीत. जगाच्या कुठल्या विशिष्ट भागाशी संबंधित नाहीत किंवा माणसांच्या कुठल्या गटाशी संबंधित नाहीत. हे नैसर्गिक नियम आहेत जे कोणाची इच्छा असो वा नसो प्रत्येकासाठी लागू आहेत.

जे नियम पुढील पानांवर शिकवलेले आहेत ते माझे नियम नाहीत, माणसांनी बनवलेले ते नियम नाहीत, किंवा काल्पनिक नियम नाहीत.

जे तुम्ही पुढील पानांवर वाचाल त्यात बरंच तुमच्या परिचयाचंही असेल. कारण या नियमांमधे मुळात नवीन काहीच नाही.

गॅलिलियो म्हणाला, जे आधीपासून माणसाच्या डोक्यात नाही ते त्याला शिकवलंही जाऊ शकत नाही.

आजसारखी अनुकूल परिस्थिती आधी कधीच

नव्हती. उदाहरणार्थ हजार वर्षांआधी किंवा तेवढं कशाला चार पाचशे वर्षांआधीच समजा तुम्ही 'राजा' नसते, तर राजा बनणं एवढं सोपं काम नव्हतं. अशक्य कदाचित म्हणता येणार नाही पण सोपं नक्कीच नव्हतं. आज परिस्थिती अशी आहे - एखादा पोरगा एखादी कंपनी सुरू करू शकतो आणि जगाला बदलण्याचं स्वप्न पाहू शकतो. संगणक क्रांती घडवून आणणारे बहुतांश जण पोरंच होते.

साधारण बुद्धिमत्तेचा कुठलाही माणूस आज यशस्वी होऊ शकतो. या पुस्तकाचा उद्देश अशा काही नैसर्गिक गोष्टी तुम्हाला सांगण्याचा आहे ज्यांना कृतीत आणल्यावर अयशस्वी होणं अशक्य होऊन जातं. कारण माणसं यशस्वी किंवा अयशस्वी योगायोगाने होत नाहीत.

पण या पुस्तकात जे आहे ते केवळ वाचून उपयोग होणार नाही, जे तुम्हीही मान्य करालच. पण कृतीत उतरवल्याने नक्कीच उपयोग होईल. उपयोग काय - यश नुसतं.

यशस्वी होणं फार सोपं आहे. यावर विश्वास ठेवणं हवं तर कठीण आहे. पण यशस्वी होणं कठीण नाही.

यशस्वी होणं नक्कीच साधं काम आहे. कसं ते

सविस्तर पाहण्याआधी मी तुम्हाला थोडक्यात सांगतो.

त्यासाठी पहिल्यांदा हे ठरवावं लागतं की यशस्वी होणं म्हणजे काय? यशस्वी होण्याचा अर्थ आपल्याजवळ काय आहे? आपल्याला काय मिळालं म्हणजे आपण यशस्वी झालो?

एकदा ध्येय निश्चित झालं की मग तिथे पोहचायचं कसं तो रस्ता शोधून काढणे ही दुसरी पायरी.

आणि एकदा निश्चित झालं की हे ध्येय आहे आणि हा रस्ता आहे, मग त्या रस्त्याने जाणे आणि ध्येयप्राप्तीपर्यंत जातच राहणे ही आहे यशाची अत्यंत महत्त्वाची पायरी.

कुठली का अडचण येईना, त्या अडचणीवर मात करून पुढे जाणं सुरूच ठेवायचं. अडचणींवर मात कशी करायची?

सोपं आहे. समोर अडचण येऊन उभी टाकली तर त्या अडचणीच्या बाजूने निघून जायचं, किंवा वरून किंवा खालून किंवा वाटल्यास मधून मार्ग काढायचा. परिस्थितीप्रमाणे ज्यात आपली कमी शक्ती लागेल ते करायचं. फक्त 'शक्य नाही' असे म्हणून सोडून द्यायचं नाही.

माणसाने समुद्रातून रस्ते बनवले आहेत, पर्वतांच्या

पोटातून रस्ते काढले आहेत. अडचणींवर मात करणे अशी गोष्ट आहे जी माणसासाठी नवीन नाही. माणूस आहे तेव्हापासून हे त्याचं नशीब आहे.

महत्त्वाची आणि लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे ध्येयावर पोहचेपर्यंत थांबायचं नाही. अशाप्रकारे माणूस ध्येयावर पोहोचतो आणि यशस्वी होतो.

आता यशशास्त्राचा सविस्तर अभ्यास ....

माणूस परिस्थितीची निर्मिती नाही.
परिस्थिती माणसाची निर्मिती आहे.

2 निश्चित ध्येय

तुम्ही कुठे जात आहात तुम्हाला माहीत नसेल
तर तुम्ही कुठे पोहचाल कोणास ठाऊक.

यशस्वी होण्यासाठी जी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे ती म्हणजे ध्येयाचा निश्चितपणा. आपल्याला काय पाहिजे याचं स्पष्ट ज्ञान. कारण त्याशिवाय बाकीचे सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत.

स्पष्टता ही सर्वांत महत्त्वाची बाब आहे. जे लोक अतिशय प्रभावीपणे काम करतात त्याचं सर्वांत प्रमुख कारण हेच असतं की त्यांचं उद्दिष्ट त्यांच्यासमोर बिलकुल स्पष्ट असतं.

जे लोक यशस्वी होतात ते एक निश्चित ध्येय समोर ठेवून मेहनत करतात.

तुम्हाला नेमकं काय पाहिजे हे माहीत असल्याशिवाय ते मिळणार कसं? निश्चित ध्येयच समोर नसेल तर जाणार कुठे? आणि तरीही कोणी गेला तरी पोहोचणार कुठे?

समुद्रप्रवासावर निघालेल्या प्रत्येक जहाजाच्या कप्तानाला माहीत असतं की आपल्याला कुठे जायचं आहे. त्यामुळेच समोर ते इच्छित ठिकाण बहुतांश वेळ दिसत नसतानाही तो जात राहतो आणि अखेर आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचतो.

ध्येय स्पष्टपणे ठरवून कागदावर लिहून घेणे हे

ध्येयप्राप्तीच्या दिशेने पहिले पाऊल आहे. सर्वप्रथम तुम्ही स्वत:साठी एक निश्चित ध्येय आणि ते मिळवण्यासाठी एक निश्चित तारीख ठरवण्याची गरज आहे.

ध्येय निश्चित करणे ही ध्येयप्राप्तीची सुरुवात आहे. ध्येय निश्चित झाल्यावर ध्येयप्राप्तीच्या वेडाने मनाला व्यापून टाका. एकाच ठिकाणी नाही तर बऱ्याच ठिकाणी आपले ध्येय लिहून ठेवा. नेहमी डोळ्यांसमोर ठेवा.

Out of sight is out of mind असं म्हणतात. म्हणजे नजरेआड कुठली गोष्ट गेली तर माणूस विसरू शकतो किंवा तीव्रता कमी होऊ शकते. आणि खरं सांगायचं तर सगळा खेळ तीव्रतेचा आहे.

तुमचं ध्येयच तुमचं जग होऊन जायला पाहिजे.

कुठल्याही मोठ्या यशाचा आरंभबिंदू म्हणजे तुम्हाला नेमकं काय पाहिजे याचा स्पष्ट निर्णय. ज्या क्षणी तुम्ही तुमचे ध्येय निश्चित करून ते कागदावर लिहून घेता त्या क्षणी तुम्ही एक वेगळेपण अनुभवता. त्या क्षणी तुम्ही तुमच्या जीवनाचा ताबा घेता. आणि स्वत:वर नियंत्रण असल्याची जाणीव सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

अपयशी माणूस ध्येयशून्यपणे भटकत राहतो. यशस्वी लोकांजवळ निश्चित ध्येय असतं.

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान हिटलरच्या छळछावणीत तब्बल तीन वर्षे व्यतीत करणाऱ्या एका माणसाने निश्चित ध्येयाची आवश्यकता किंवा अनिवार्यता स्वत:च्या उदाहरणाद्वारे सांगितली आहे.

व्हिक्टर फ्रॅन्कल त्या माणसाचं नाव होतं. सध्या ही व्यक्ती अमेरिकेच्या एका आंतरराष्ट्रीय विद्यापीठात कार्यरत आहे. ही व्यक्ती मनोरोगतज्ज्ञ सुद्धा आहे.

नाझी छळछावण्यांमधे लोक रोज सकाळी मृत्यूला सामोरे जाण्याची संभावना घेऊनच झोपेतून उठायचे. नाना प्रकारचे छळ, विषारी वायू आणि उपासमार हे या

लोकांचं रोजचं नशीब होतं.

कित्येक वेळा स्वत: मृत्यूच्या तोंडातून बचावलेल्या व्हिक्टर फ्रॅन्कल यांनी जवळून छळाचं निरीक्षण केलं - छळ करणाऱ्यांचं आणि छळ सहन करणाऱ्यांचं - दोघांचंही.

ते म्हणतात,'छळछावण्यांमधे सारख्याच परिस्थितीला तोंड देताना एक जण मरायचा आणि दुसरा वाचायचा'.

व्हिक्टर फ्रॅन्कल यांना जे दिसलं ते असं की ज्या लोकांसमोर आयुष्यात काही निश्चित ध्येय होतं ते लोक वेगवेगळ्या छळांतून जिवंत बाहेर यायचे. पण ज्यांच्याजवळ जिवंत राहण्याचं काही कारण किंवा उद्देश नव्हता असे लोक सहज आणि पटापट मरून जायचे. (अखेरीस या छळछावण्यांमधून शंभरात सरासरी चार पाच लोकांची जिवंत सुटका झाली.)

स्पष्ट चित्र

ध्येय निश्चित झाल्यावर तुम्ही तुमच्या मनाला ध्येयप्राप्तीच्या वेडाने आणि ध्येय प्राप्त होणारच या विश्वासाने अशा प्रकारे व्यापून टाकायला पाहिजे की तुम्ही स्वत:ला ध्येय प्राप्त झालेल्या अवस्थेत पाहू शकता.

मायकलअँन्जेलो नामक शिल्पकाराला जेव्हा विचारलं गेलं की हा जो तू दगडाला कोरून इतका छान पुतळा बनवला ते तू कसं केलं.

शिल्पकार म्हणाला, 'काहीच नाही. पुतळा आधीच तिथे होता - मी फक्त वरवरचा नको असलेला दगडाचा भाग काढून टाकला'.

दगडात होता हेही खरंच आहे. पण पहिल्यांदा हा पुतळा त्या शिल्पकाराच्या डोक्यात होता.

ध्येय निश्चित आणि स्पष्ट असल्याशिवाय यशस्वी होण्या किंवा न होण्याचा मुद्दाही उपस्थित होत नाही.

तुम्ही तुमच्या ध्येयाबद्दल इतकं स्पष्ट होण्याची गरज आहे की त्याचं चित्र तुमच्या डोक्यात आणि डोळ्यांसमोर स्पष्टपणे उभं राहायला पाहिजे. प्रत्यक्षात

येण्यापूर्वी तुम्ही तुमच्या डोक्यात ते प्रत्यक्षात आल्याइतकं स्पष्ट पाहू शकायला पाहिजे.

ज्याप्रमाणे मायकलअँन्जेलोने पुतळा कोरण्या-आधी स्वत:च्या डोळ्यांसमोर त्या पुतळ्याचं स्पष्ट चित्र पाहिलं त्याप्रमाणे तुमच्या ध्येयाचं चित्र तुम्हाला स्पष्टपणे पाहता यायला पाहिजे.

ध्येय निश्चित करा.
तुमच्या ध्येयाला मनात कोरून टाका.
ध्येयाने झपाटून जा.
यश तुमच्याकडे अक्षरश: ओढलं जाईल.

निश्चित ध्येय आणि मेंदू

लक्षात ठेवा आपल्या मेंदूला आपल्या ध्येयाबद्दल स्पष्ट आणि सरळ सूचना लागतात.

संपूर्ण शक्ती आणि तीव्रता एका निश्चित ध्येयावर एकवटून आणि ध्येयप्राप्तीपर्यंत निरंतर मेहनत करून आपण यशस्वी होतो.

ज्या प्रमाणात तुम्ही तुमच्या सर्व शक्तींना एका सुस्पष्ट आणि सुनिश्चित ध्येयावर केंद्रित कराल अगदी त्या प्रमाणात तुम्ही यशस्वी व्हाल.

निश्चित ध्येय असेल तर आपलं मन आपली सर्व शक्ती त्या ध्येयाच्या प्राप्तीपर्यंत त्या ध्येयावर केंद्रित करू शकतं. या उलट निश्चित ध्येय नसेल तर आपली शक्ती वायाच जाणार.

निश्चित लक्ष्य नसेल तर तसाही तुम्ही नेम धरू शकत नाही.

स्पष्ट आणि निश्चित ध्येय असलेला माणूस अतिशय खडतर रस्त्यावर सुद्धा प्रगती करेल. ध्येयशून्य माणूस रस्ता कितीही गुळगुळीत असला तरी कुठेही पोहचणार नाही.

ध्येयावर न पोहोचणे ही शोकांतिका नाही.
पोहोचण्यासाठी ध्येयच नसणे ही खरी
शोकांतिका आहे.

अशा माणसासाठी काहीच अशक्य नाही ज्याला माहीत आहे त्याला काय पाहिजे आणि ते मिळवण्याचा ज्याने निश्चय केला आहे.

कुठलीच प्रतिकूल परिस्थिती इतकी शक्तिशाली असू शकत नाही की निश्चित ध्येय असलेल्या माणसाला ती कायमचं अडवून ठेवू शकेल.

निश्चित ध्येय आणि तिथपर्यंत पोहोचण्याचा दृढ निश्चय केलेल्या माणसाला भेटल्यावर विरोध आणि अडथळे गायब होऊन जातात.

- इमरसन

3 इच्छा

विद्यार्थी तयार झाला की शिक्षक हजर होतो.

- चायनीझ म्हण

निश्चित ध्येय किंवा ध्येयनिश्चिती ही पहिली पायरी झाली. ध्येयप्राप्तीसाठी त्यानंतर पाहिजे ध्येयवेडेपणा.

यशाच्या काही नियमांपैकी जो नियम सध्या मी तुम्हाला सांगत आहे तो इच्छेची शक्ती दर्शवणारा आणि इच्छेची आवश्यकता सांगणारा हा नियम आहे.

हा नियम सांगतो की जेव्हा तीव्र इच्छा घेऊन ध्येयाच्या दिशेने तुम्ही जाता, इतक्या तीव्र इच्छेने की जेव्हाही तुमच्यासमोर एखादी अडचण किंवा अपयश येतं तुमची इच्छा आणखीच तीव्र होते, जादूप्रमाणे गोष्टी घडायला लागतात. एक दार बंद होत नाही तोच दुसरं दार आपोआप उघडतं - आणि ताबडतोब. इतक्या खात्रीने की याला अपवादच नाही.

दार बंद होण्याची चिंता नाही. फक्त जात राहायचं - उदासीनपणे आणि निश्चिंतपणे. मनात तीव्र इच्छा आणि समोर निश्चित ध्येय. कुठलीच गोष्ट तुम्हाला थांबवू शकत नाही. असा एक माणूस जगात नाही जो तुम्हाला तुमच्या ध्येयप्राप्तीपासून रोखू शकेल.

इच्छा तीव्र असताना रस्त्यात कुठलीही अडचण आली तर अडचणीवर मात करण्याचा मार्ग तुम्हाला सापडेलच.

'इच्छा तेथे मार्ग' या अर्थाची म्हण जगातील कुठल्या भाषेत नाही?

इच्छा माणसाची तीव्र असली तर त्या इच्छेच्या पूर्तीसाठी सामान्य, साधारण माणसाला असामान्य शक्ती मिळून जाते.

तुम्ही कुठलंही वाजवी ध्येय प्राप्त करू शकता. प्रश्न एकच आहे, यशस्वी होण्याची इच्छा किती तीव्र आहे? किती वाईटरित्या तुम्हाला ते पाहिजे?

यात शंका नाही, जराही शंका नाही की जर तुमच्याजवळ इच्छा असेल - तीव्र इच्छा, तर तुमच्या यशाची गॅरन्टी देणारी यापेक्षा मोठी गोष्ट नाही.

माणसाकडे तीव्र इच्छा असणे, म्हणजे ध्येयप्राप्तीसाठी माणूस झपाटलेला असणे ही अशी गोष्ट आहे ज्यामुळे माणूस कुठल्याही अडचणीतून मार्ग काढू शकतो.

जेव्हा माणसाला एखादी गोष्ट वाईटरित्या हवी असते, ते मिळवून देण्यासाठी संपूर्ण सृष्टी त्याच्या पाठीशी उभी असते.

एक जुनी म्हण आहे, ज्याची इच्छा तुम्ही बाळगता त्याबद्दल खबरदार राहाल ..... कदाचित तुम्हाला ते मिळूनच जाईल.

जेव्हा माणूस एखाद्या गोष्टीसाठी वेडा होऊन जातो - त्याला मदत करण्यासाठी, त्याला ती गोष्ट मिळवून देण्यासाठी अक्षरश: संपूर्ण सृष्टी पुढे सरसावते.

---

4 विचार

विचार बदला, जीवन बदला.

तुम्हाला जर वाटत असेल की तुम्ही हराल किंवा पराभूत व्हाल तर वास्तविक हरण्याची वाट पाहण्याची गरज नाही. हरले तुम्ही आधीच. मग एकदा प्रयत्न करून पाहण्यासाठी लागणारी शक्ती वाचवून घेतलेलीच बरी.

कारण हरण्याच्या विचाराने माणसं कधीच जिंकली नाहीत. जिंकण्याच्या आधी तुम्हाला याची खात्री पाहिजे की तुम्ही जिंकू शकता. जिंकण्यासाठी सर्वात पहिली जी आवश्यक पात्रता आहे ती जिंकण्याच्या विचारांची - जिंकण्याच्या विश्वासाची.

विचारांची शक्ती अशी गोष्ट आहे त्याची गंभीरता ज्याच्या लक्षात आली तो विचारांना कधीच सहज घेणार नाही.

एका प्राथमिक शाळेच्या शिक्षिकेने एक प्रयोग केला. तिच्या वर्गातील मुलांच्या पालकांच्या संमतीने हा प्रयोग करण्यात आला.

तिने वर्गातील मुलांना सांगितलं, 'एका नुकत्याच हाती आलेल्या शास्त्रीय अहवालानुसार निळ्या डोळ्यांची मुले तपकिरी डोळ्यांच्या मुलांपेक्षा जास्त हुशार असतात, आणि जास्त लवकर शिकतात'.

मग त्या शिक्षिकेने वर्गाला दोन गटात विभागलं.

एक गट निळ्या डोळ्यांच्या मुलांचा जे शास्त्रीय अहवालानुसार हुशार होते आणि दुसरा गट 'ढ' मुलांचा- तपकिरी डोळ्यांची मुले.

असं निदर्शनास आलं की जवळपास एका आठवड्यात तपकिरी डोळ्यांच्या मुलांचा शिक्षण स्तर दिसून पडेल इतका खालावला आणि निळ्या डोळ्यांच्या मुलांचा स्तर स्पष्टपणे उंचावला.

मग पुढच्या दिवशी त्या शिक्षिकेने वर्गात धक्कादायक घोषणा केली. ती म्हणाली, 'माझ्याकडून चूक झाली - फार मोठी चूक. त्या शास्त्रीय पाहणीचा निष्कर्ष मी तुम्हाला चक्क उलटा सांगितला. तपकिरी डोळ्यांची नाही तर निळ्या डोळ्यांची मुले 'ढ' असतात. तपकिरी डोळ्यांची मुले हुशार असतात आणि पटापट शिकतात'.

या घोषणेनंतर तपकिरी डोळ्यांच्या मुलांचा दर्जा सुधारायला लागला आणि निळ्या डोळ्यांच्या मुलांचा दर्जा घसरायला लागला.

आपण जे विचार करतो तेच आपण शेवटी बनतो. इतकं सोपं आहे. म्हणूनच विचार विचारपूर्वक निवडा. जे पाहिजे फक्त त्यावर आपले विचार केंद्रित करा.

जे नको आहे तिकडे लक्षच देऊ नका.

बहुतांश अपयशी लोकांमधे एक साम्य दिसून येतं ते म्हणजे एक तर त्यांना आपल्या विचारांचा आपल्यावर जो प्रभाव पडतो त्याची कल्पना नसते किंवा ते या गोष्टीकडे लक्षच देत नाहीत.

अपयशाचा विचार का करावा जेव्हा यशाचे विचार करायलाही तेवढीच शक्ती लागते, काही एक्स्ट्रा खर्च तर येतच नाही.

चुकीचे विचार आपली शक्ती काढून घेतात. योग्य विचार आपल्याला शक्ती देतात.

विषारी विचार, विषारी माणसे, विषारी पुस्तके - अशा प्रकारे टाळा जसं तुम्ही विषारी सापांना टाळाल.

मर्यादा

स्वत:च्या विचारांनी स्वत:वर लादलेल्या मर्यादा सोडल्या तर बाकी काही मर्यादा नाहीत.

आपल्या मर्यादा आपणच आपल्यावर लादलेल्या असतात. लक्षात ठेवा तुम्ही काय किंवा किती करू शकता याची मर्यादा तुम्ही आणि फक्त तुम्हीच ठरवता.

वायुगतिकी (aerodynamics) च्या नियमांनुसार फुलपाखराला उडता यायला नको. तरीही ते उडतं. माहीत आहे असं का?

कारण फुलपाखराला हे नियम माहीतच नाहीत.

एक्स्पर्ट लोक जेव्हा जाहीर करून टाकतात की एखादी गोष्ट केली जाऊ शकत नाही, तेव्हा एखादा पोरगा जातो आणि चक्क करून येतो. माहीत आहे असं का होतं?

'केलं जाऊ शकत नाही' हे त्या मुलाला माहीतच नसतं.

तुम्ही काय करू शकता किंवा काय बनू शकता याला काही मर्यादा नाहीत. ज्या आहेत त्या तुम्हीच ठरवलेल्या.

5

दृष्टिकोण

दृष्टिकोन बदला,
दृश्य बदलेल.

माणसाची क्षमता,
माणसाची कल्पनाशक्ती अमर्याद आहे.

एखाद्या घटनेमधे तुम्हाला खुश करण्याची किंवा दु:खी करण्याची शक्ती नसते. कुठलीही घटना असो त्या घटनेकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन हे ठरवतो की तुम्ही त्या घटनेमुळे खुश व्हाल की दु:खी की काहीच नाही.

कुठल्याही गोष्टीला किंवा घटनेला महत्त्व किंवा किंमत तेवढीच प्राप्त होते जेवढी तुम्ही देता. एखाद्या घटनेचा तुम्ही कसा अर्थ लावता त्यावर तुमची प्रतिक्रिया अवलंबून असते.

लक्षात ठेवा स्वत:ला शक्ती आपणच देतो, स्वत:ची शक्ती आपणच काढून घेतो.

कशी का परिस्थिती असत नाही, तुम्ही त्याला असं रूप देऊ शकता की त्याच्यामुळे तुम्हाला शक्तीच मिळेल.

बघण्याचा दृष्टिकोन तुम्ही निवडता. एखाद्या घटनेचा परिणाम तुमच्यावर काय व्हावा हे घटना ठरवत नाही, तुम्ही ठरवता.

प्रश्न : अपयश, अडचणी, अडथळे, कठीण परिस्थिती काय करू शकतात?

उत्तर : तुमची शक्ती काढून घेऊ शकतात. किंवा तुम्हाला शक्ती देऊ शकतात.

पण आधी त्या तुम्हाला विचारतात काय करायचं.

तुमची निवड अंतिम असते.

6 विश्वास

यश आणि अपयशाची सुरुवात विश्वासापासून होते.

तुमचा जर विश्वास असेल की तुम्ही एखादी गोष्ट करू शकता किंवा तुमचा विश्वास असेल की तुम्ही ती गोष्ट करू शकत नाही, दोन्हीपैकी कुठलाही विश्वास जो तुम्ही कराल तो खराच ठरेल.

तुमच्याकडे काही करण्याची सर्व योग्यता असतानाही जर तुम्ही ठरवले की मी हे करू शकत नाही, तुम्ही ती गोष्ट घडवून आणणारे मेंदूचे सर्व मार्ग बंद करून टाकता.

तसंच तुम्ही जर स्वत:ला म्हणाले की 'तुम्ही एखादी गोष्ट करू शकता' तर ती गोष्ट शक्य करण्यासाठी लागणारे सर्व मार्ग तुम्ही उघडून टाकता.

आपल्या विश्वासाचा आपल्या जीवनावर जो प्रभाव पडतो तो प्रचंड आहे.

एखादी गोष्ट आपण करू शकतो हा विश्वास निर्माण करण्याचा खात्रीचा मार्ग म्हणजे एकदा ती गोष्ट करणे हा होय. एकदा आपण काही करण्यात यशस्वी झालो की आपण पुन्हा यशस्वी होऊ शकतो हा विश्वास आपोआप वाढीस लागतो.

एक अविश्वसनीय गोष्ट... विश्वासाची

एक मुलगी होती. विल्मा रुडॉल्फ नावाची. वेळेच्या आधी जन्माला आलेली एक मुलगी. वर्ष १९४०. जन्माच्या वेळचे तिचे वजन दोन किलो. गरीब काळ्या कुटुंबात जन्मली.

लहानपणी तिला पोलियो झाला.

तिच्या आईला एका डॉक्टराने सांगितलं यावर काहीच इलाज नाही. पण एवढं ऐकून तिची आई गप्प बसेना.

विल्मा जुनी आठवण काढताना म्हणाली, 'डॉक्टर म्हणाले मी पुन्हा कधीच चालू शकणार नाही. माझी आई म्हणाली मी नक्कीच चालेन. मी माझ्या आईवर विश्वास ठेवला.'

विल्माच्या आईला पत्ता लागला की तिच्या गावापासून ८० किलोमीटर अंतरावर एक दवाखाना आहे जिथे तिच्यावर उपचार केला जाऊ शकतो.

विल्माची आई सलग दोन वर्षे आठवड्यात दोन वेळा मुलीला घेऊन त्या दवाखान्यात गेली. दोन वर्षांच्या

उपचारानंतर विल्मा कुबड्यांच्या साहाय्याने चालायला लागली.

अखेर वयाच्या बाराव्या वर्षी ती कुबड्यांशिवाय सामान्यपणे चालायला लागली.

वयाच्या सोळाव्या वर्षी १९५६ च्या ऑलिम्पिक्समधे तिने धावण्याच्या शर्यतीत कास्यपदक पटकावलं.

१९६० च्या ऑलिम्पिक्समधे धावण्याच्या शर्यतीत तीन सुवर्णपदके जिंकून तीन सुवर्णपदके जिंकणारी ती अमेरिकेची पहिली स्त्री बनली.

बायबलमधे आहे :- मोहरीच्या दाण्याइतकाही विश्वास तुम्हाला असेल आणि त्या विश्वासाच्या बळावर तुम्ही पर्वताला म्हणाल 'चल इथून, त्या पलीकडच्या जागेवर जा', जाईल तो. आणि कुठलीच गोष्ट तुमच्यासाठी अशक्य राहणार नाही.

हे वाचल्यावर एका बाईने प्रात्यक्षिक करून पाहायचं ठरवलं. रात्री झोपायला जाण्यापूर्वी घराच्या खिडकीतून तिने पर्वताला आदेश दिला, 'चल इथून, त्या पलीकडच्या जागेवर जा. सकाळपर्यंत गेला तरी चालेल'.

सकाळी उठून त्या बाईने खिडकीतून पाहिलं. पर्वत तिथेच होता. ती म्हणाली, 'मला माहीतच होतं. पर्वत कसा जाईल'.

त्या बाईला पर्वत जाऊ शकतो हा विश्वास नव्हता. पर्वत जाऊच शकत नाही हा विश्वास तिला होता. झालं तसंच. पर्वत गेलाच नाही.

विश्वास ही माणसाला लाभलेली एक फार मोठी शक्ती आहे. अनेक मोठमोठे चमत्कार माणसाने या शक्तीच्या बळावर केले आहेत.

7 कृती

अतिशय यशस्वी लोकांचा जो वेगळेपणा मला वेळोवेळी दिसून आला तो म्हणजे त्यांची काम करण्याची अमर्यादित क्षमता.

- B. C. Forbes

कृतीमुळे माणूस यशस्वी होतो. कृतीमुळे परिणाम घडून येतात. ज्ञान ही शक्ती आहे असं म्हणतात ते अर्धसत्य आहे. कारण ज्ञानाला कृतीत उतरवल्याशिवाय ज्ञानाचा काय फायदा?

सामान्य माणूस आणि अतिशय असामान्य माणूस यांच्यामध्ये तुम्हाला आश्चर्य वाटेल फरक फक्त कृतीचा असतो.

अतिशय असामान्य माणसाकडे कृती करण्याची असामान्य क्षमता असते.

लक्षात ठेवा कृतीच सगळं काही आहे.

जोपर्यंत तुम्ही पाऊल उचलणार नाही तोपर्यंत तुम्ही त्याच जागेवर राहाल. आणि जितक्या लवकर तुम्ही कामाला लागाल तितक्या लवकर तुम्ही पोहचाल.

निश्चय करून घ्या, जे करायचंच आहे ते लगेच करायचं आहे. जोपर्यंत आपण काही करणार नाही तोपर्यंत आपली स्थिती सुधरणार नाही.

लक्षात घ्या : तुमची परिस्थिती स्वत:हून अचानक जादूने सुधरणार नाही.

तुम्ही बदलेपर्यंत काहीच बदलणार नाही. जे तुम्ही आत्तापर्यंत करत होते तेच तुम्ही करत राहिले तर जे तुम्हाला आत्तापर्यंत मिळत होतं तेच मिळत राहील.

आधी कधीच न मिळवलेलं मिळवण्यासाठी आधी कधीच न केलेलं करावं लागेल.

SUCCESS MADE SIMPLE

यशस्वी होण्यासाठी

१. नेमकं काय पाहिजे ते ठरवा.

२. स्पष्ट, नेमक्या शब्दांत लिहून घ्या.

३. पूर्ण करण्याची अंतिम तारीख निश्चित करा.

४. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामांची यादी बनवा.

५. योग्य क्रमाने ही यादी लावा.
(पुढे आवश्यकतेनुसार या यादीत किंवा क्रमात बदल केला जाऊ शकतो.)

६. ताबडतोब कामाला लागा. बिल्कुल विलंब करू नका.

७. रोज काही ना काही करा.

समजा तुम्ही वेटलिफ्टिंगचं साहित्य आणि वेटलिफ्टिंगचं पुस्तक घरी आणलं तर त्यापासून तुम्हाला किती फायदा मिळतो हे कुठली गोष्ट ठरवेल?

तुम्ही त्याचा किती वापर करता ही गोष्ट.

बिल्कुल त्याच प्रमाणात तुम्हाला त्या साहित्याचा फायदा होईल ज्या प्रमाणात तुम्ही त्याचा वापर कराल.

या पुस्तकात प्रस्तुत केलेल्या नियमांच्या बाबतीतही तसंच आहे.

बोलणं पुरेसं नाही, चालणं आवश्यक आहे. ज्ञान पुरेसं नाही, कृती आवश्यक आहे. किती लोक असतील ज्यांच्याकडे ज्ञान आहे. पण ज्ञानानंतर कृती पाहिजे.

किती असंख्य अपयशी लोक असतील ज्यांच्याकडे यशस्वी माणसाइतकं किंवा त्याहीपेक्षा जास्त ज्ञान आहे. पण कृती नाही.

लक्षपूर्वक ऐका, मोठ्याने सांगतोय. सगळा खेळ कृतीचा आहे.

सर्व काही तुमच्यावर अवलंबून आहे. परिस्थिती बदलावी असं तुम्हाला वाटत असेल तर आधी **तुम्हाला** बदलावं लागेल. परिस्थिती सुधरावी असं तुम्हाला वाटत असेल तर प्रथम **तुम्हाला** सुधरावं लागेल.

शिक्षक दार उघडून देतो.
पण आत प्रवेश तुम्हालाच करावा लागतो.

- चायनीझ म्हण

आधी करा, नंतर सांगा

- रशियन म्हण.

आपण काय करू शकतो या दृष्टीने आपण स्वत:कडे पाहतो. आपण काय केलेलं आहे या दृष्टीने लोक आपल्याकडे पाहतात.

- H.W. Longfellow

तुम्ही काय करू शकता हे जगाला सांगू नका.
करून दाखवा.

योजना

ध्येय संपादन करण्यासाठी योजना निश्चित करा.

लक्षात ठेवा योजनाशून्य कृती प्रत्येक
अपयशाचं कारण आहे.

तुमच्या योजनेमधे 'आज' करण्यासाठी
काहीतरी समाविष्ट करा.

योजना तयार करण्यासाठी खर्च केलेला एक
मिनिट ती योजना अमलात आणताना दहा मिनिटे
वाचवतो.

झाड तोडण्यासाठी माझ्याकडे आठ तास असले
तर त्यातले सहा तास मी कुऱ्हाडीला
धार लावण्यात घालवेन.

- अब्राहम लिंकन

सुरुवात

वेगवेगळ्या प्रकारचे लोक आहेत. सुरू करण्यासाठी कोणी कशाची वाट पाहतो, कोणी कशाची. कोणाचा प्रश्न असतो - पैशांशिवाय मी सुरुवात कशी करू शकतो?

पण खरा प्रश्न आहे - सुरुवात केल्याशिवाय पैसे कसे येतील?

यशस्वी व्यवसायाची सुरुवात किंवा व्यवसायाची यशस्वी सुरुवात करण्यासाठी जे भांडवल तुम्हाला लागेल ते पैशाच्या रूपात नाही. विचाराच्या रूपात आहे. जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त सेवा देण्याचा विचार.

सुरुवात हा कुठल्याही कामाचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे.

वाट पाहू नका. सुरुवात करा. सुरुवात करण्यासाठी तुम्हाला अगदी हवी तशी वेळ कधीच येणार नाही. जिथे तुम्ही आहात तिथून, जी काही साधने तुमच्याकडे आहेत त्यांना घेऊन सुरुवात करा. आत्ता.

फक्त सुरुवात करा आणि तुमचं डोकं प्रतिसाद देईल.
सुरू ठेवा आणि कार्य पूर्ण होईल.

- Goethe

8 मेहनत

मेहनतीला पर्याय नाही.

निसर्गात न्याय आहे. संपूर्ण न्याय. निसर्गाने दिलेला न्याय अर्धवट किंवा लहरीपणाचा कधीच असत नाही. लहरी निसर्ग असं आपण पेपरात कधी वाचतो. त्या वाचण्याचा इथे काही संबंध नाही. कारण निसर्गात निरपवादपणे न्याय आहे.

एखाद्याला मागचं पुढचं काहीच माहीत नसताना त्याने एखादे उदाहरण देऊन सांगावं की हा अन्याय आहे किंवा विचारावं की हा आहे का न्याय? अशा युक्तिवादाचा काही संबंध नाही.

जसं एखाद्याने बी पेरावं आणि दुसऱ्या दिवशी विचारावं, कुठे आहे झाड, कुठे आहे फळ - हा आहे का न्याय तर त्याला काही अर्थ नाही. एवढं लक्षात घेणं सध्या पुरेसं आहे की निसर्गात न्यायाशिवाय दुसरं काही नाही. फक्त न्याय आहे.

त्यामुळे एखाद्या माणसापेक्षा जास्त तुम्हाला हवं असेल तर तुम्हाला त्याच्यापेक्षा जास्त मेहनत करावीच लागेल. तुम्हाला आज जे मिळत आहे ते तुम्ही काल जे पेरलं त्याचं फळ आहे.

तुम्हाला आज जे मिळत आहे त्यापेक्षा भविष्यात तुम्हाला जर जास्त हवं असेल किंवा वेगळं हवं असेल

किंवा अधिक चांगलं हवं असेल तर तुम्हाला वर्तमानात अधिक चांगलं किंवा वेगळं किंवा जास्त पेरावं लागेल.

तुम्हाला आयुष्यात जी कोणती गोष्ट पाहिजे तिची काही ना काही किंमत आहे जी तुम्हाला द्यावीच लागते - पूर्ण आणि आगाऊ.

मेहनतीला पर्याय नाही. मेहनतीची माणसाकडे खूप क्षमता आहे. असे लोक आहेत जे सलग बारा बारा, अठरा अठरा तास काम करतात. सलग शंभर शंभर तास काम करून विक्रम नोंदवणारे लोक सुद्धा आहेत.

म्हणूनच अशी म्हण आहे स्पॅनिश किंवा इटॅलियन भाषेत किंवा चायनीझ असेल कदाचित, या क्षणी माझ्या लक्षात नाही. पण म्हण अशी आहे:-

माणूस थकल्यानंतरही बरंच अंतर चालू शकतो.

लक्षात ठेवा

थकणे हा पर्याय नाही.

ध्येयाच्या वेडाने ग्रस्त लोक कामात एवढे गढून जातात की थकण्याची आठवणही राहत नाही. पण आपण जर स्वत:च ठरवलं की आपण एका तासानंतर थकणार आहोत तर एका तासाची वाट पाहण्याची गरज पडत नाही, अर्ध्या तासापासूनच थकायला सुरुवात होते आणि तासाभरानंतर आपण थकलो याची आठवणही करून द्यावी लागत नाही.

होन्डा नामक व्यक्तीबद्दल असं म्हटलं जातं की तो कामात इतका वाईटरित्या मग्न असायचा की त्याची एकाग्रता भंग करणं जवळजवळ अशक्य काम होतं. पण त्याशिवाय होन्डा हे नाव जगात सगळीकडे जाणं कसं शक्य होतं?

पॉल गेटि नावाचा एक दुसरा अतिश्रीमंत माणूस होता. पण जन्माने नाही. त्याच्या व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात असं म्हटलं जातं तो रात्री क्वचितच झोपायचा.

मेहनतीची जागा शब्द घेऊ शकत नाहीत. मुंबईत एका होर्डिंगवर (जाहिरात फलकावर) मी एक जाहिरात वाचली. ही बिजिंग ऑलिम्पिक्स सुरू होण्याच्या किंचित आधीची किंवा सुरूच झाले असतील तेव्हाची गोष्ट आहे. त्या होर्डिंगवर लिहिलेलं होतं, 'चायना को झीरो मिलेगा, सारे मेडल मुंबई जीतेगा', पण झालं काय,

चायना 'शंभर' घेऊन गेला आणि आपण - तुम्हाला माहीतच आहे.

कोणाला वाटेल ती तर एक जाहिरात आहे. पण असं नाही. आपले बोलणे आणि करणे आपल्या विचारांचेच प्रतिबिंब असते. मग ती जाहिरात का असत नाही.

सांगायचं तात्पर्य : मेहनतीची जागा शब्द घेऊ शकत नाहीत.

मेहनतीशिवाय काहीच नाही. आपण आरामात खुर्चीत बसून राहतो म्हटलं तर आपण कसं पोहचणार कुठे. प्रत्येक यशस्वी माणसाचं उदाहरण हे मेहनत आणि चिकाटीचं उदाहरण आहे.

प्रत्येक मोठ्या यशाच्या मागे निश्चित ध्येय समोर ठेवून आणि संपूर्ण शक्ती त्या ध्येयावर केंद्रित करून केलेल्या कठोर मेहनतीची कित्येक वर्षे असतात.

कुठलंही ध्येय किंमत मोजल्याशिवाय साध्य होणार नाही.

लोकांना टीव्ही पाहू द्या. गप्पा मारू द्या. झोपा काढू द्या. तुमच्याकडे यासाठी वेळ नाही. ध्येयाने झपाटलेल्या माणसाला ध्येयाशिवाय दुसरं काही दिसतच नाही. दिसायला पण नको.

सर्व यशस्वी लोक खूप मेहनत करतात.

एडीसनची सर्वात मोठी विशेषता जी त्याची सर्वात मोठी संपत्ती होती ती म्हणजे एकाग्रता. एकदा प्रयोग किंवा संशोधन सुरू केल्यावर जे तो शोधतोय ते सापडेपर्यंत किंवा त्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न संपेपर्यंत तो कधीच थांबायचा नाही. काही योगायोग नाही की १०९३ शोधांचे पेटन्ट एडिसनच्या नावावर आहेत.

स्वत:च्या जीवनाचा स्तर स्वत:च्या मेहनतीने उंचावण्याची निर्विवाद योग्यता माणसाजवळ आहे यापेक्षा दुसरी प्रेरणादायी गोष्ट मला माहीत नाही.

- Henry David Thoreau

9 चिकाटी

सोडू नका. कधीच सोडू नका.
कधीच कधीच कधीच सोडू नका.

-विन्स्टन चर्चिल

चिकाटीची जागा जगात कुठलीच गोष्ट घेऊ शकत नाही.
कुठलीच प्रतिभा, कुठलीच बुद्धिमत्ता,
कुठलीच विद्वत्ता, काहीच नाही.
चिकाटीसमोर कोणीच उभा राहू शकत नाही.

कधीच कधीच कधीच कधीच कधीच सोडायचं नाही. ही यशाची किल्ली आहे. एखादी अडचण समोर उभी ठाकल्यामुळे होऊ शकतं तुम्हाला वळण रस्ता वापरावा लागेल, धुळीच्या रस्त्याने जावं लागेल. जायचं, पण सोडायचं नाही.

यशस्वी होण्यासाठी छोट्या मोठ्या कारणामुळे सोडून चालणार नाही. ध्येय प्राप्त होईपर्यंत मेहनत सुरू ठेवावी लागेल.

यशाच्या मार्गावर इतरांपासून तुम्हाला वेगळं करणारा एक गुण म्हणजे बाकी लोक सोडून देत असताना - आपण जात राहण्याची योग्यता, आपण सुरू ठेवण्याची योग्यता, एका शब्दात चिकाटी.

चिकाटीची तुलना त्या सतत पडणाऱ्या पाण्याशी करता येईल जे अखेर अतिकठीण दगडालाही झिजवून टाकतं.

यशस्वी होणारा माणूस सोडत नाही. सोडणारा माणूस यशस्वी होत नाही.

प्रश्न : जर पूर्ण एक हत्ती खायचा असेल तर कसा खावा?
उत्तर : 'एका वेळेस एक घास' असा.

न थकता अविरतपणे संपूर्ण शारीरिक आणि मानसिक शक्ती एका गोष्टीवर केंद्रित करणे ही यशासाठी लागणारी पहिली अट आहे.

- थॉमस एडिसन

काम पूर्ण होईपर्यंत काम करत राहायला स्वत:ला विवश करा.

भीती

भीतीवर रामबाण उपाय म्हणजे कृती.

धाडस किंवा हिम्मत म्हणजे भीतीचा अभाव नाही. प्रत्येकाला भीती वाटते. मुळात भीती ही माणसाची गरज आहे. भीती हा गुण माणसाच्या अस्तित्वासाठी अनिवार्य आहे. फक्त भीतीवर नियंत्रण ठेवून भीती वाटत असतानाही जे कृती करतात त्यांना जग धाडसी म्हणतं.

जी गोष्ट करण्याची भीती वाटते ती गोष्ट करा. भीतीचा अंत निश्चित आहे.

- इमरसन

तुम्ही जोखीम घेत नसाल तर तुम्ही त्याहीपेक्षा जास्त जोखीम घेत आहात.

काहीच न करणे हा खरा धोका आहे.

बंदराच्या ठिकाणी जहाज सुरक्षित असते. पण तिथे ठेवण्यासाठी जहाज बनवले जात नाही.

सर्व जोखीम आणि धोके संपल्याशिवाय जो निघायला तयार नाही तो कधीच निघू शकणार नाही.

-थॉमस फुलर

नेहमी भीतीत राहण्यापेक्षा एकदा धोका पत्करा.

- थॉमस फुलर

11 अपयश

अपयशे जितकी जास्त, यश तितकं मोठं.

अपयशाचे फायदे आहेत. अपयशासारखा गुरू नाही. कुठले अपयश तुमच्या कोणत्या यशासाठी निर्णायक ठरेल सांगता येत नाही. आपलं काम आहे अपयश आलं तर त्यापासून शिकायचं, स्वत:मधे आवश्यक बदल करायचे आणि चालत राहायचं, फक्त थांबायचं नाही. अशा चिकाटीमुळेच माणूस यशस्वी होतो.

तुमच्या माहितीसाठी, कोका कोला हे आधी डोकेदुखीचं औषध होतं. पण त्यामुळे डोकेदुखी बरी व्हायची नाही. कोका कोलाचं हे लहान अपयश कोका कोलाच्या मोठ्या यशासाठी निर्णायक ठरलं असेल कोणास ठाऊक.

सर्व यशस्वी लोक तुम्हाला सांगतील की यश हे अपयशाच्या किंवा अपयशांच्या पलीकडे सापडतं. बरेच लोक पलीकडचं पाहू शकत नाहीत, बऱ्याच लोकांना पलीकडचं दिसत नाही. त्यामुळे अडचण समोर उभी ठाकल्यावर ते लोकं थांबून जातात. सोडून देतात. कोणास ठाऊक पलीकडे किती मोठं यश त्यांची वाट पाहत असेल जे त्यांना थांबून गेल्यामुळे कधीच मिळणार नाही.

सिल्वेस्टर स्टॅलन (रॅम्बो) हे नाव तुम्ही ऐकलेलंच

असेल. तो यशस्वी झाला किंवा असं म्हणा तुम्ही त्याचं नाव ऐकू शकले कारण हजारपेक्षा अधिक वेळा 'नाही' हे उत्तर ऐकूनही त्याने प्रयत्न थांबवले नव्हते. तो न्यूयॉर्कमधल्या प्रत्येक एजन्टकडे गेला आणि प्रत्येकाने म्हटलं 'नाही'.

त्याने प्रयत्न सुरू ठेवले आणि शेवटी 'रॉकी' नामक चित्रपट बनवला. फारच कमी लोक इतक्या वेळेस 'नाही' ऐकूनही प्रयत्न सुरू ठेवू शकतात. फारच कमी लोक इतकं मोठं यश मिळवतात.

अडचणीमधे शक्ती नाही. अपयशामधे शक्ती नाही. 'नाही' या शब्दामधे स्वत:हून कुठलीच शक्ती नाही. या गोष्टी आपल्याला तेव्हाच प्रभावित करू शकतात जेव्हा आपण त्यांना शक्ती देतो.

माणसाला आयुष्यात अपयश पाहिजेच. त्याशिवाय यशाची मजाही येणार नाही. किंवा मोठं यशही मिळणार नाही. अपयशाने माणूस अधिक मजबूत बनतो. अपयशाने माणसाचा निर्णय अधिक दृढ होतो. रस्त्यात भेटणाऱ्या अपयशांची चिंता नाही. अपयशांचं स्वागत करून अपयशांना चकित करा आणि पुढे निघून जा.

अपयश किंवा पराभव लाजायची गोष्ट नाही. माणूस खऱ्या अर्थाने तेव्हाच अपयशी किंवा पराभूत होतो जेव्हा तो प्रयत्न सोडून देतो.

चुका करणे ही शरमेची बाब नाही. पण तीच चूक दुसऱ्या वेळेस करणे हा मात्र वेळेचा मोठा अपव्यय आहे. चुकण्याची भीती बाळगू नका. फक्त तीच चूक पुन्हा करू नका.

जेव्हा माणूस हे स्पष्ट करतो, हे जाहीर करतो की आपल्या ध्येयप्राप्तीसाठी कुठल्याही अडचणींना किंवा अपयशांना न डळमळणाऱ्या विश्वासाने तोंड देण्यासाठी तो तयार आहे, एवढंच काय रस्त्यातल्या अडचणी किंवा अपयश त्याच्यासाठी असंबंधित गोष्टी आहेत - तेव्हा त्या अडचणी आश्चर्यकारकरित्या गायब होऊन जातात.

बहुतांश लोकांच्या अपयशाचं कारण म्हणजे ते आपले विचार अपयशावर केंद्रित करतात. आता तुम्हीच सांगा अपयशांवर लक्ष केंद्रित करायचं काय काम आहे? रस्त्यात पडणारी गावे महत्त्वाची की मुक्काम?

चूक न करण्याची हमी फक्त तोच माणूस देऊ शकतो जो काहीच करत नाही.

12 अनिश्चय

अनिश्चय अपयशाची गुरूकिल्ली आहे.

स्पष्ट निर्णय घेण्याच्या केवळ एका कृतीने तुमची शक्ती तत्क्षणी वाढते.

दृढनिश्चयाने माणसातली शक्ती जागृत होते. ध्येयप्राप्तीची दुर्दम्य इच्छा माणसाला अशी शक्ती देते ज्या बळावर तो अडचणींना पायदळी तुडवत अप्राप्य वाटणाऱ्या यशाच्या शिखरावर पोहोचतो.

डिमॉस्थनीझ नावाचा एक ग्रीक मुलगा होता. वक्ता होण्याची त्याची इच्छा होती. त्यात काही मोठं नाही. पण डिमॉस्थनीझने इच्छेला निश्चयाची जोड दिली. असं केल्याबरोबर माणसाला लगेच यश मिळत नाही. पण असं केल्यामुळे माणूस येणाऱ्या अडचणींवर मात करू शकतो. जसं, डिमॉस्थनीझ तोतरा होता. पण इच्छा आणि निश्चय एकत्र आल्यामुळे तोतरेपणावर मात करून डिमॉस्थनीझ जगातील एक महान वक्ता होऊ शकला.

इतिहास अशा लोकांच्या उदाहरणांनी भरलेला आहे ज्यांनी शुद्ध दृढ निश्चय आणि इच्छाशक्तीच्या बळावर समोर आलेल्या प्रत्येक अडचणीवर मात करून यश प्राप्त केलं.

यशाची गुरूकिल्ली : निर्णय घ्या आणि कामाला लागा.

न्यूटनचा नियम

न्यूटनचा गतिचा पहिला नियम सांगतो की (बाहेरील कुठल्याही शक्तीचा हस्तक्षेप न झाल्यास) 'चालत असलेली वस्तू सरळ रेषेत चालत राहते, थांबलेली वस्तू थांबलेली राहते'.

म्हणजे तुम्ही बसलेले असाल तर बसूनच राहण्याकडे तुमचा कल अधिक असतो. त्याच स्थितीत राहण्याची ही प्रवृत्ती मोडून चालायला लागण्यासाठी थोडी मेहनत लागते. पण एकदा आपण चालायला लागलो की चालत राहणं सोपं होतं. या निर्सगाच्या नियमाचा फायदा करून घ्या. लगेच निर्णय घेऊन ताबडतोब चालायला लागा.

अनिश्चयी माणसं यशस्वी होत नाहीत. कारण यशस्वी होण्यासाठी कृती करावी लागते. आणि निर्णय घेतल्याशिवाय आपण काहीच करू शकत नाही.

निर्णय कधीही उपलब्ध माहितीच्या आधारावर घ्यावा लागतो. निर्णय चुकण्याची संभावना पूर्णपणे कधीच संपत नाही. परफेक्ट निर्णय अशा प्रकारची कुठलीच गोष्ट नाही.

यशस्वी माणसं निर्णयावर पटकन पोहोचतात आणि रोज रोज निर्णय बदलत नाहीत. जो सारखा निर्णय बदलतो, असं समजा की यशशास्त्र त्याच्या कामाचं नाही.

निश्चयी माणसाला कोणी थांबवू शकत नाही. अनिश्चयी माणसाला थांबवण्याची गरजच पडत नाही. तो जागेवरून निघतच नाही.

अनिश्चय हा वेळेचा अपव्यय करण्याचा सर्वात
प्रभावी मार्ग आहे.

निर्णय न घेतल्यामुळे माणसाच्या हातून कितीतरी
संधी निसटून जातात.

अपयशी लोकअनिश्चयी असतात.
किंवा असं म्हणा -
अनिश्चयी लोकअपयशी असतात.

अनिश्चय सैतानाचे सर्वात प्रभावी हत्यार आहे.

अनिर्णयापेक्षा चुकीचा निर्णय बरा.

13 सवय

आपल्या सवयी आपल्यावर राज्य करतात.

सवय ही माणसाच्या आयुष्यातील एक अतिशय मोठी शक्ती आहे.

सवयींकडे लक्ष द्या. सवयी माणसाला घडवतात. सवयी माणसाला नष्ट करतात. सवयी केवळ इच्छा-शक्तीच्या बळावर तुटत नाहीत किंवा स्वत:हून आपले आपण सुटत नाहीत. वाईट सवयींच्या जागेवर चांगल्या सवयी ठेवाव्या लागतात.

पुन्हा पुन्हा केलेल्या कुठल्याही गोष्टीची सवय लागते. पुन्हा पुन्हा केलेली प्रत्येक कृती सवय जडवणारी असते.

जी कुठली सवय आपल्याला आहे ती आपणच विकसित केलेली आहे.

जेव्हा आपण वाईट सवयींचे पालनपोषण करून त्यांना मोठे करतो त्या सवयींचे परिणाम आपल्यासमोर येणारच. हे परिणाम आपल्याला न आवडणारे असू शकतात. तरीही आपल्याला हे परिणाम मिळणारच. ते परिणाम आपल्याला आवडतात की नाही हा मुद्दाच नाही. शेवटी बी आणि फळाचा प्रश्न आहे.

बी एक असेल तर फळ दुसरं कसं मिळेल?

14 यश

यशस्वी होणं फक्त शक्यच नाही तर आजच्या युगात ते कधी नव्हतं इतकं सोपं आहे.

यश हा अपघात नाही. निश्चित ध्येय समोर ठेवून ते ध्येय प्राप्त होईपर्यंत चिकाटीने सुरू ठेवलेल्या मेहनतीचा तो परिणाम आहे.

यशस्वी माणूस म्हणजे कुठलाही माणूस म्हणजे कोणताही सामान्य माणूस ज्याला आपलं ध्येय माहीत आहे आणि ते प्राप्त करण्यासाठी जो कुठलीही किंमत मोजायला तयार आहे.

यश हे कुठल्या खास योग्यता किंवा प्रतिभा किंवा ज्ञान असलेल्या माणसासाठी राखीव नाही. यश हे त्या माणसाच्या इच्छेवर, मेहनतीवर आणि चिकाटीवर अवलंबून आहे.

यशस्वी व्हायला - म्हणजे पाहिजे ते मिळवायला वयाची मर्यादा (किंवा एक्स्पायरी डेट) नाही. म्हणजे अमुक वयानंतर माणूस यशस्वी होऊ शकत नाही असं बिलकुल नाही.

यशस्वी होणे म्हणजे आपला उद्देश किंवा आपले ध्येय प्राप्त करणे. यशस्वी होणं आजच्या युगात फक्त शक्यच नाही तर ते कधी नव्हतं इतकं सोपं आहे.

आजच्या काळात यशस्वी होणं इतकं सोपं आहे हे सांगण्याचा अर्थ कोणी यशस्वी होईल की नाही हा मुद्दाच

राहिलेला नाही.

यश म्हणजे दुसरं तिसरं काही नाही. काही गोष्टी आहेत ज्यांना एकत्र केल्यावर जे मिळतं त्याला यश म्हणतात. त्या गोष्टी कुठल्या?

त्या गोष्टी आहेत : निश्चित ध्येय, ध्येयप्राप्तीची ज्वलंत इच्छा, ध्येय मिळेपर्यंत न सोडण्याचा गुण म्हणजे चिकाटी.

यश अपघाताने मिळत नाही.

यशस्वी आणि अयशस्वी लोकांमधे फरक काय?

यशस्वी लोक ती कामे करण्याची सवय घालून घेतात जी कामे करण्याचं अपयशी लोक टाळतात. असं नाही की ती कामे यशस्वी लोकांना फार आवडतात. पण त्यांना माहीत आहे जे करायला पाहिजे ते केल्याशिवाय आपल्यालाही अपयशीच राहावं लागेल.

यशस्वी लोक आपल्या समस्यांचं उत्तर स्वत:मधे शोधतात. अपयशी लोक नेहमी बाहेर बघतात. बाहेर बघू नये असं नाही. पण जी गोष्ट आत आहे ती बाहेर सापडेल कशी?

अपयशी लोक शब्द देण्यासाठी टाळाटाळ करतात. यशस्वी माणसं शब्द देतात आणि पाळतात.

असं म्हणतात, जगामधे यशाची इच्छा बाळगणारे तीन प्रकारचे लोक आहेत:-

१) जे कामचुकार आहेत.
२) जे आपलं जेवढं काम आहे तेवढं करतात.
३) जे लोकांच्या अपेक्षेच्या पुढे जातात, त्यांना मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा नेहमी जास्त देतात.

पहिल्या प्रकारच्या माणसाला जसं तुम्हालाही माहीत आहे काही चान्सच नाही.

दुसऱ्या प्रकारचे लोक जिथे आहेत तिथे राहण्यात कसेबसे यशस्वी होतात.

आणि तिसऱ्या प्रकारचे लोक आहेत जे पुढे निघून जातात.

यशस्वी होण्यासाठी

१) यशस्वी होण्यासाठी सर्वात पहिल्यांदा तुमच्या यशस्वी होण्याचा अर्थ - म्हणजे तुमचे नेमके ध्येय काय हे स्पष्टपणे आणि निश्चित ठरवा.

२) ध्येयावर पोहोचण्यासाठी सुरुवातीपासून शेवटपर्यंतची योजना आखा. तारखांसहित. जर तुम्ही तुमचे ध्येय आणि तुमच्या योजनेबद्दल इतके स्पष्ट नसाल तर काही उपयोग नाही.

३) तुमचे ध्येय आणि तुमची योजना कागदावर लिहून घ्या आणि वेळोवेळी वाचत राहा, पण लिहिणं अनिवार्य आहे. लिहिल्यामुळे तुमचं हे ध्येय आहे आणि तिथपर्यंत तुम्ही अशा प्रकारे पोहचणार आहात हे अधिक स्पष्ट होऊन जातं.

जर तुमच्याकडे काही स्वप्न असेल आणि ते साकार करण्यासाठी मेहनतीच्या रूपात किंमत मोजण्याची तुमची तयारी असेल तर कोणालाही हे सांगू देऊ नका की ते केलं जाऊ शकत नाही. आजच्या युगात केलं जाऊ शकत नाही असा काही प्रकार नाही.

शाळा आणि यश

शाळेतील कामगिरीचा आयुष्यातील यशाशी संबंध नाही. काही विशेषज्ञ तर इतकं मानतात की शाळाशिक्षण माणसाच्या यशस्वी होण्यात अडथळा ठरू शकते. कदाचित याचमुळे आयुष्यात मोठं यश मिळवलेल्या बऱ्याच लोकांनी शाळा किंवा कॉलेज पद्धतशीरपणे पूर्ण करण्याची काळजी घेतलेली नाही.

प्रदीर्घ शिक्षणाने माणसाचं धाडस, काही करून दाखवण्याची जिद्द, जोखीम पत्करण्याची क्षमता कमी होऊ शकते.

यशाचं शाळेशी फारसं काही देणं घेणं नाही.

अपयशी होण्याच्या कारणांची यादी बनवून एखादी गोष्ट अशक्य आहे हे जाहीर करण्यापेक्षा यशस्वी होण्याच्या कारणांची यादी बनवा.

ज्ञानापेक्षा कल्पनाशक्ती जास्त महत्त्वाची आहे.

- अल्बर्ट आइन्स्टाइन

फ्रॅन्क वुलवर्थ नावाचा एक माणूस होता. त्याने अख्ख्या अमेरिकेत सर्वत्र स्वत:ची दुकानं उघडली. आणि त्याच्या काळातली जगातील सर्वात उंच इमारत बांधली.

त्याच्या यशाचं रहस्य काय होतं?

एक कल्पना. असं दुकान उघडण्याची कल्पना ज्यात कुठल्याही वस्तूची किंमत पाच सेन्ट पेक्षा जास्त असणार नाही.

त्याने ३०० डॉलर उधार घेऊन असं एक दुकान उघडलं. पण अशा दुकानाची कल्पना आल्याबरोबर किंवा पहिलं दुकान उघडल्याबरोबर तो यशस्वी झाला नाही. वेगवेगळ्या अडचणींना आणि अपयशांना तोंड देत पहिल्या दहा वर्षांत तो बारा दुकाने उघडू शकला. शेवटी अमेरिकेच्या गावागावात दुकाने उघडत तो अमेरिकेतील अतिश्रीमंत लोकांपैकी एक बनला.

तो गरीब होता. पायात घालायला चप्पल नाही. वाईट थंडीपासून बचावासाठी पुरेसे कपडे नाहीत. त्याला नोकरीही मिळत नव्हती. शेवटी एका दुकानात जेव्हा त्याला काम मिळालं तर ते या अटीवर की पहिले तीन महिने तो विनापगार काम करेल. त्यानंतर त्याला

एका दिवसाला अर्धा डॉलर प्रमाणे पगार मिळेल आणि काम रोज पंधरा तास.

दारिद्र्याने त्याच्या आयुष्यात चमत्कार घडवून आणला. तो त्याच्या काळचा जगातील सर्वात मोठा रिटेल मर्चंट बनला.

> इतिहासात बऱ्याच लोकांची कल्पनाशक्ती कठीण परिस्थितीमुळे जागृत झाली आहे. बऱ्याच प्रतिभावान सिद्ध झालेल्या लोकांची प्रतिभा मुळात कठीण परिस्थितीमुळे बाहेर आली.

15 द्रोणो

अपयशी लोकांना तुम्ही जवळून पहाल तर तुम्हाला दिसेल की त्यांच्या पूर्ण विचारसरणीचे सार 'घेणे' हे असते.

यशाची सर्वात मोठी किल्ली म्हणा किंवा सर्वात खात्रीची किल्ली म्हणा किंवा आणखी काही. पण हा एक निसर्गाचा नियम आहे ज्याला मोडून यशस्वी होणे अशक्य आहे.

नियम : जितकं तुम्ही प्राप्त करत आहात किंवा जितकं तुम्ही प्राप्त करू इच्छिता त्यापेक्षा जास्त द्या. नेहमी.

अपयशी लोकांची मुख्य समस्या म्हणजे त्यांना प्रथम **हवं असतं**. पण हे शक्यच नाही. निसर्गाने निश्चित केलेला क्रम आपण उलटा करू शकत नाही.

अपयशी माणसं याची वाट बघतात की कोणीतरी येईल आणि त्यांना देईल. होऊ शकतं कोणीतरी येईल आणि देईलही. पण गॅरन्टी नाही. मिळण्याची गॅरन्टी तेव्हा आहे जेव्हा तुम्ही प्रथम देता.

पण थांबा. याचा अर्थ असा नाही की एकदा दिलं म्हणजे झालं. **नियम असा आहे** : द्यायचं आणि देतच राहायचं. कशाचीच, कोणाचीच वाट पाहायची नाही. आतापर्यंत मी खूप दिलं, आता मला पाहिजे - असं तुम्ही म्हणाले की खेळ संपला. हिशोब केला की खेळ संपला.

तुम्ही म्हणाले मीच कधीपर्यंत देणार की संपला खेळ.

तुम्ही असा आग्रह धरू शकत नाही की बी पेरून मला एक आठवडा झाला, आता मला फळ पाहिजे - बिल्कुल आत्ता. नाहीतर खत, पाणी घालणं मी ताबडतोब बंद करेन. त्यामुळे काय होईल तुम्हाला माहीत आहे - खेळ संपेल.

बी पेरा. खत घाला. पाणी द्या. देखभाल करा आणि करतच राहा. द्या आणि देतच राहा.

किती वेळा आपण लोकांचं असं बोलणं ऐकतो - त्यात खूप पैसा आहे, खूप मार्जिन आहे, खूप नफा आहे. ही अपयशी मनाची मानसिकता आहे.

निसर्गाचा नियम: जे आपण देतो तेच आपल्याला मिळतं. आपल्याला काय मिळावं याबद्दल आपली इच्छा काही का असत नाही - आपल्याला तेच मिळतं जे आपण देतो.

जे लोक त्यांना जे मिळतं त्याच्या मोबदल्यात त्यापेक्षा जास्त किंवा त्यापेक्षा चांगलं देतात त्या लोकांना उशिरा किंवा लवकर त्यांनी दिलं त्यापेक्षा जास्त मिळतं.

एखाद्याने शक्य तेवढं कमी द्यायचं ठरवलं तरी कदाचित तो आयुष्य जगून घेईल. पण जे त्याला मिळेल ते सुद्धा शक्य तेवढं कमीच असेल.

जेव्हा तुम्ही तेवढंच करता जेवढा तुम्हाला मोबदला मिळतो - जेवढे तुम्हाला पैसे मिळतात तेव्हा एखाद्याचं लक्ष तुमच्याकडे वेधलं जाईल असं तुम्ही काहीच केलं नाही. आणि जेव्हा तुम्ही स्वत:हून त्यापेक्षा जास्त करता जेवढं तुम्हाला मिळतं, तेव्हा ज्यांना तुमच्यामुळे फायदा होतो त्यांचं लक्ष तुमच्याकडे किंवा तुमच्या व्यवहाराकडे वेधलं जाणारच.

असे लोक तुम्हाला भरपूर सापडतील जे म्हणतात की मला हे करण्याचे पैसे मिळत नाहीत, का बरं करेन मी? पण अशा विचाराचा एकही यशस्वी माणूस तुम्हाला सापडणार नाही.

बी आणि फळ, कारण आणि परिणाम, साधन आणि साध्य यांना विभक्त केलं जाऊ शकत नाही, असं इमरसनने म्हटलं. कारण त्याने सांगितलं बी मधे फळ, कारणामधे परिणाम आणि साधनामधे साध्य आधीपासूनच असतं.

जर तुम्ही एखाद्या कृतघ्न माणसाची सेवा करत असाल, इमरसन म्हणाला, तर आणखी जास्त सेवा

करा. चक्क परमेश्वराला ऋणी करा, परमेश्वराला कर्जदार बनवा. मोजून मोजून प्रत्येक कृतीचं प्रतिफळ तुम्हाला मिळेल. मिळायला जेवढा उशीर झाला तेवढं तुमच्याचसाठी चांगलं आहे. चक्रवाढव्याजावर चक्रवाढव्याज लागू होईल.

- इमरसन

किती माणसं आपलं अख्खं आयुष्य या गैरसमजुतीमधे व्यतीत करतात की त्यांना फसवलं जाऊ शकतं. पण माणसाला स्वत:शिवाय दुसऱ्या कोणाकडून फसवलं जाणं अशा प्रकारे अशक्य आहे जसं एखादी गोष्ट एकाच वेळेस असावी आणि नसावी सुद्धा.

- इमरसन

प्रत्येक व्यवहाराला एक अदृश्य पार्टी साक्ष असते. निसर्ग याची हमी घेतो, स्वत:वर याची जबाबदारी घेतो की प्रामाणिकपणे दिलेली सेवा प्रतिफळाने वंचित राहणार नाही.

- इमरसन

हेन्री फोर्ड आपल्या यशाच्या शिखरावर असताना त्याला रोज जवळपास दोन दोन हजार पत्रं यायची. मागणारी पत्रं. देणगी मागणारी पत्रं.

या पत्र लिहिणाऱ्या किती लोकांना हा विचार शिवला असेल की हेन्री फोर्डकडे जी संपत्ती आहे ती त्याच्याकडे आली कशी.

फोर्डच्या बिझिनेस फिलॉसॉफीचे सार असे होते: जास्तीत जास्त लोकांना कमीत कमी किमतीत चांगल्यात चांगली वस्तू द्या.

ज्या वेळेस दुसरे कार निर्माते त्यांच्या उत्पादनांच्या किमती वाढवत होते आणि कामगारांचा पगार कमी करत होते, हेन्री फोर्ड त्याच्या उत्पादनांच्या किमती कमी करत होता आणि कामगारांचा पगार वाढवत होता. झालं काय?

हेन्री फोर्ड अमेरिकेतील सर्वात श्रीमंत माणूस बनला. जे लोक कमीत कमी देऊन जास्तीत जास्त घेण्याच्या प्रयत्नात रोज अपयशी होतात त्यांना शिकण्याची संधी आहे.

फक्त उलटं करा. जास्तीत जास्त घेण्याचं विसरा. नाहीतरी मिळणारच नाही. जास्तीत जास्त द्यायला सुरुवात करा. बाकीची काळजी निसर्ग घेईल.

हा योगायोग नाही की हेन्री फोर्डने इ. स. १९२७ पर्यंत अमेरिकेत दीड कोटी कार विकल्या. अशा काळात जेव्हा कार चैनीची वस्तू समजली जायची. अशा काळात जेव्हा कितीतरी देशांमधे कार पहायला मिळणं कठीण होतं. प्रत्येक घरात कार असं स्वप्न त्याने त्या काळात पाहिलं.

'देणे' ही गोष्ट यशप्राप्तीसाठी अनिवार्य गोष्ट आहे. मोठमोठे यश हे केवळ मोठ्या प्रमाणावर दिल्याचं फळ आहेत. अस्तित्वात असलेल्या गोष्टीपेक्षा काहीतरी वेगळं देणे, जास्त देणे, अधिक चांगलं, अधिक स्वस्त, अधिक वेगवान, अधिक सोपं काहीही. पण देणे.

अशी उदाहरणं जवळजवळ नाहीतच ज्यामधे माणसाला याच्या उलट म्हणजे न देता किंवा कमी देऊन किंवा खराब देऊन मोठं यश मिळालं. मला तर अशाप्रकारे मिळवलेल्या लहान यशाबद्दलही माहिती नाही.

किती दुर्दैवी आहे तो माणूस ज्याला कळलेलं आहे की आधी बी - नंतर फळ, तरीही त्याला हा क्रम उलटा करूनच हवा आहे...... जे कधीच घडणार नाही.

हे माझं काम नाही

म्हणणं आणि कृती तर सोडा असा विचारही कधी करू नका की हे माझं काम नाही. ज्या लोकांना भविष्य नाही असे लोकच असा विचार करतात आणि असं बोलतात. तुम्ही नाही.

जास्तीचं काम करण्यासाठी, तुमचं नसलेलंही काम करण्यासाठी नेहमी तयार रहा आणि तशी तयारी दर्शवा. कुठलंही काम समोर आलं तर पहिल्यांदा तुमचा हात वर जायला पाहिजे.

तुमच्याकडून काय अपेक्षित आहे ते दिल्यानंतर तुम्ही आणखी काय देता याच्यावर तुमचं यश अवलंबून आहे.

अपेक्षेएवढं देऊन, करायला पाहिजे किंवा करायला पर्यायच नाही तेवढं करून कोणीच पुढे जाऊ शकत नाही.

जास्त देण्याचे मार्ग शोधा. तुम्ही वेगाने पुढे निघून जाल कारण या जास्त देण्याच्या मार्गावर गर्दी नसते.

आश्चर्यचकित करा.

आश्चर्यचकित करणारी सेवा द्या. तुमच्या ग्राहकाने किंवा तुमच्या वरिष्ठाने काही मागितलं, काही करायला सांगितलं तर हातातलं सगळं बाजूला ठेवून इतक्या पटकन ते करा की समोरचा माणूस आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहणार नाही.

आश्चर्यचकित करून सोडणे हे यशाचे रहस्य आहे. आश्चर्यचकित करण्याची कुठलीही संधी सोडू नका.

एकदा मी कारच्या नंबर प्लेटवर नंबर लिहून घेण्यासाठी एका दुकानात गेलो. तिथल्या माणसाने माझ्या गाडीचा नंबर लिहून घेतला, मला कसे फॉन्ट पाहिजेत ते विचारलं आणि म्हणाला, 'दोन मिनिटे, आलो मी, तुम्ही बसा'.

मी बसलो. दोन मिनिटे म्हणजे काहीच नाही. कोणीही दोन मिनिटे मागितली तर खुशीने द्यायला पाहिजे असं माझं मत आहे. एवढंच कशाला दोन मिनिटे कोणी मागितली तर त्याचा शब्दशः अर्थ बरोबर दोनच मिनिटे असाही काढायला नको असं मला वाटतं.

पण हा नंबर प्लेटवाला माणूस खरंच दोन मिनिटात आला - तो चक्क माझ्या गाडीचा नंबर लिहिलेली नंबर

प्लेट घेऊन आला. मी अवाक् झालो. त्यावर विश्वास ठेवायला मला अक्षरश: थोडा वेळ लागला.

आपण आज कस्टमर फर्स्ट, कस्टमर गॉड, कस्टमर राइट असे शब्द जिकडे तिकडे ऐकतो. पण तरीही जेव्हाही आपल्याला खरोखर फास्ट आणि चांगली सर्विस मिळते तेव्हा आपण प्रभावित आणि आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहत नाही. असं का?

असं यासाठी की रोज आपण चांगल्या सर्विसचा नाही - नुसत्या शब्दांचा अनुभव घेत आहोत. जे शब्द वरून आकर्षक, प्रभावी आणि भारदस्त दिसतात परंतु आतून पोकळ आहेत.

शब्दांच्या वापरात लोक आज कधी नव्हते तेवढे पटाईत झाले आहेत. त्यांना वाटतं शब्दांनी काम होत असेल तर त्यापेक्षा काय चांगलं?

पण मी तुम्हाला सांगतो, शब्दांनी काम भागत तर नाहीच पण भागत नाही ही फार चांगली गोष्ट सुद्धा आहे. वरदान आहे हे. आज जगात संधी इतक्या वाईटरित्या उपलब्ध आहेत ते याचमुळे की जास्तीत जास्त लोक शब्दांनी काम भागवायचा प्रयत्न करत आहेत आणि शब्दांनी काम भागत नाही.

शब्द नाही, फक्त कृती.

तुम्ही जेव्हा देता तेव्हा तुम्हाला मिळतं आणि मार्ग निघत जातात. जे लोक केवळ जास्तीत जास्त मिळवण्याच्या विचाराने किंवा इच्छेने झपाटलेले आहेत ते अशा पीकाच्या कापणीची वाट पाहत आहेत ज्यासाठी पेरणी त्यांनी केलेलीच नाही. त्यांचं नशीब तुम्हाला माहीत आहे.

काही दिवसांआधी एक सद्गृहस्थ मला म्हणाले, 'तुम्ही कमीत कमी किमतीत चांगल्यात चांगली वस्तू द्यायचा विचार करू शकता कारण तसा प्लॅटफॉर्म तुम्हाला मिळालेला आहे, तशी अनुकूल परिस्थिती तुमच्याजवळ आहे. प्रत्येकजण असा विचार करू शकत नाही कारण प्रत्येकाकडे अशी परिस्थिती असत नाही'.

खरं तर वस्तुस्थिती या उलट होती.

मला एखादा प्लॅटफॉर्म मिळाल्यामुळे मी तसा विचार करत नव्हतो. एक वेळ असं म्हणता येईल, मी तसा विचार करत असल्यामुळे मला तो प्लॅटफॉर्म मिळाला.

मिळवण्यासाठी आधी द्या.

देण्या देण्यातील फरक

काही दिवसांपूर्वी एका वृत्तपत्रात एका रेस्टॉरन्टची जाहिरात माझ्या नजरेस पडली. त्या जाहिरातीत सांगितलेलं होतं : थाळी शंभर रुपयाला, आणि थाळी पार्सलमधे हवी असल्यास १२० रुपये.

मला वाटलं ही पण एक कला आहे - मागे राहण्याची, ज्यात अपयशी लोक पारंगत असतात.

तुम्हाला दुसरं एक उदाहरण सांगतो. टॉम मॉनहन नावाच्या व्यक्तीने अमेरिकेत 'डॉमीनोज पिझ्झा' नावाने रेस्टॉरन्ट्सची श्रृंखला सुरू केली. त्याने लोकांना सांगितलं 'ताजा, गरम पिझ्झा अर्ध्या तासात - तुमच्या दारात, नाहीतर फ्री'.

बघा, शब्दयोजना पहा. यात यशस्वी माणसाची मानसिकता पहायला मिळते.

अयशस्वी लोकांची विचारशैलीच वेगळी असते, ते कधीच असा दमदार शब्द देणार नाहीत. शब्द देऊन अडकायचं नाही अशी त्यांची रणनीती असते. पण अशा रणनीतीने कोणीच युद्ध जिंकले नाही.

मागे राहण्यासाठी फक्त इतकं करा :

जास्त मागा - नेहमी.

आणि देण्याचा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा

शक्य तेवढं कमी द्या.

तुम्हाला जास्त हवं असेल तर पहिल्यांदा तुम्हाला जास्त देण्याचा मार्ग शोधून काढावा लागेल.

देणे आणि घेणे आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. प्रश्न इतकाच की प्रथम काय? पण हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. या प्रश्नाचं उत्तर एकच आहे - प्रथम द्यावं लागेल.

उलट करण्याचा कोणी प्रयत्न केला तर नैराश्याशिवाय काही हाती येणार नाही.

जेवढे पैसे तुम्हाला मिळत आहेत त्यापेक्षा जास्त काम करण्याची तुमची तयारी असेल, काय मिळतंय हा विचार बाजूला सारून तुमच्या क्षमतेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी बजावण्याची तुमची तयारी असेल तर तुम्ही रस्त्यातील कुठल्याही अडचणीवर मात करू शकता. मग तुमचं शिक्षण किती जास्त आहे किंवा किती कमी आहे किंवा तुमच्याकडे सुरुवात करण्यासाठी किती भांडवल आहे या असंबंधित गोष्टी आहेत.

जास्त मिळवणं फार सोपं आहे. तुम्हाला जेवढं मिळत आहे त्यापेक्षा जास्त तुम्ही द्यायचं. बस एवढंच. लवकरच अशी वेळ येईल जेव्हा तुम्ही देता त्यापेक्षा जास्त तुम्हाला मिळायला लागेल.

हे कसं होईल याची चिंता करण्याची गरज नाही. खरं तर हे कसं किंवा का होतं मलाही माहीत नाही. पण फळ खाण्यासाठी हे माहीत असणं गरजेचं नाही की ते फळ बनलं कसं. फक्त बी पेरण्याची गरज आहे.

तुम्हाला जे मिळतं त्यापेक्षा अधिक सेवा किंवा अधिक चांगली सेवा जेव्हा तुम्ही देता तेव्हा त्याचा सर्वाधिक फायदा कोणाला होतो? **तुम्हालाच**. आणखी कोणाला?

जेव्हा माणूस मला काय मिळेल हा विचार सोडून आपण काय देऊ शकतो आणि जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त कसं देऊ शकतो यावर आपलं लक्ष केंद्रित करतो, त्याला पत्ता लागण्याच्या आधीच जग त्याला त्यापेक्षा अधिक द्यायला लागतं.

बहुतांश लोक जे यशाच्या शिखरावर पोहोचले त्यांची सुरुवात मोठ्या भांडवलापासून झाली नाही. भांडवल नंतर येतं. फिलॉसॉफी (विचारधारा) आधी. इथेच बहुतांश लोक चुकतात. त्यांना आधी पैसे हवे असतात. आधी भांडवल हवं असतं. आधी फक्त हवं असतं - हे लोक जणू म्हणतात: आधी फळ द्या, नंतर बी पेरू. पण असं आजवर घडलं नाही.

जेव्हा आपण एखाद्याच्या यशाकडे पाहतो, उदाहरणार्थ नुकत्याच आटोपलेल्या बिजिंग ऑलिम्पिक्समधल्या मायकल फेल्प्सच्या आठ सुवर्णपदकांकडे पाहतो, चीनने जिंकलेल्या शंभर पदकांकडे पाहतो, तेव्हा आपण फक्त परिणामाकडे किंवा फळाकडे पाहत असतो. पण लक्षात घेण्याची आणि ठेवण्याची गोष्ट म्हणजे कारणाशिवाय परिणाम नाही. बी शिवाय फळ नाही.

कुठलं का काम तुम्ही करत नाही, यशस्वी होण्याचा खात्रीचा मार्ग म्हणजे अपेक्षेपेक्षा जास्त आणि जास्त चांगली सेवा देणे.

ज्यासाठी तुम्हाला पैसे मिळत आहेत त्यापेक्षा अधिक आणि अधिक चांगली सेवा द्यायला सुरुवात करा आणि तुम्हाला कळण्याआधीच जग तुम्हाला तुम्ही देत आहात त्यापेक्षा जास्त पैसे द्यायला लागेल.

माझ्याकडे एक गृहस्थ काही दिवस कामाला होते. जेव्हा जेव्हा या माणसाच्या चुकांमुळे किंवा निष्काळजीपणामुळे किंवा बेजबाबदारपणामुळे माझे नुकसान झाले मी त्यांना समजावून सांगितलं. पण जेव्हा शेवटी हे स्पष्ट झालं की आता आणखी आशावाद बाळगण्यात काही अर्थ नाही, तेव्हा मी त्यांना कामावरून कमी केलं.

ते म्हणाले ठीक आहे. आणि निघून गेले.

पण काही दिवसांनंतर कोणास ठाऊक त्यांना कुठून आयडिया आली ते परत माझ्याकडे आले. आणि म्हणाले, 'मी तुमचा एवढा फायदा करून दिला तुम्ही आता मला किमान सहा महिन्याचा फुकट पगार द्या. कारण मला दुसरीकडे काम पण मिळत नाहीये'.

जवळून निरीक्षण केल्यास तुम्हाला या उदाहरणात एक समानता आणि एक विरोधाभास दिसेल.

ज्या कारणामुळे मी त्यांना काढलं ते कारण आणि त्यांची ही नवीन मागणी यात संपूर्ण सारखेपणा आहे. **या दोन गोष्टी वाईटरित्या समान आहेत.**

आणि विरोधाभास असा की मी तुमचा फायदा करून दिला आणि मला दुसरीकडे काम मिळत नाहीये.

असं होत नाही. लोक फायदा करून देणारी माणसे सोडून नुकसान करून देणारी माणसे शोधत नाहीत.

देणाऱ्या माणसाचं सगळीकडे स्वागत असतं. बोलावतात अशा माणसाला लोक. मागण्या करणारा माणूस असतो तो ज्याला लोक परत पाठवतात.

त्या गृहस्थाने मला मागितलं आणि मी देण्यास असमर्थ ठरलो यात आमच्या दोघांची काहीच भूमिका नव्हती. इथे निसर्गाचा एक शक्तिशाली नियम कार्यरत होता.

तो नियम म्हणजे : काहीही घेण्यासाठी आधी द्यावं लागतं.

द्या पहिल्यांदा.

आपले शेजारी राष्ट्र चीनचेच उदाहरण घ्या. बिजिंग ऑलिम्पिक्समधे शंभर पदके चीनने जिंकली. ही अख्ख्या जगासाठी लक्षवेधक आणि प्रेरणादायक घटना ठरली. पण लक्ष देण्याची किंवा विचार करण्याची गोष्ट म्हणजे यासाठी निश्चित ध्येय समोर ठेवून मेहनतीच्या आणि कृतीच्या रूपात जी किंमत त्यांनी मोजली ती पहिल्यांदा मोजली की त्यांना पदके पहिल्यांदा मिळाली?

कल्पना करा जर चिनी लोकांनी मेहनतीऐवजी दुसरा सोपा मार्ग अवलंबला असता - उदाहरणार्थ मागण्या करण्याचा मार्ग. आणि सरळ ऑलिम्पिक समितीसमोर जाऊन ते जर म्हणाले असते, 'आम्ही चीनवरून आलो. आमची लोकसंख्या तर तुम्हाला माहीतच आहे. एवढी लोकसंख्या पाहता आमच्या वाट्याला किमान शंभर पदके यायला पाहिजेत. तुम्ही स्वत: कॅलक्युलेटरवर हिशोब करून पहा. त्यामुळे शंभरच्या खाली पदके आम्ही घेणार नाही. आणि तुम्ही म्हणत असाल तर त्यासाठी मेहनतही करायला आम्ही तयार आहोत, पण ती आम्ही नंतर करू. करणार नाही असं नाही. पण आधी शंभर पदके'.

अशा प्रकारे मागणाऱ्याला - कितीही जोर देऊन मागणाऱ्याला - कितीही आकर्षक आणि प्रभावी शब्दांच्या साहाय्याने मागणाऱ्याला काय मिळेल

तुम्हाला माहीत आहे. कारण प्रश्न मागताना जोर देण्याचा किंवा आकर्षक शब्द वापरण्याचा नाही, प्रश्न आहे आधी देण्याचा.

सांगण्याचं तात्पर्य : फक्त देण्याची गरज आहे. मागण्या करण्याची नाही. देणं हे पेरणं आहे. ज्यानंतर मागावं लागत नाही. मिळण्याची कापणी करावी लागते- फक्त.

कोणाला वाटेल, दिलं म्हणजे मिळतंच असं आवश्यक नाही. पण कोणाच्या वाटण्याचा संबंध नाही, कोणाच्या मर्जीचा संबंध नाही. तटस्थ, उदासीन आणि निष्ठूर अशा निसर्गाच्या नियमांचा संबंध आहे.

दिल्यावर न मिळणं अशक्य आहे.

अपयशाची गुरूकिल्ली

अपयशाची अनेक कारणं असू शकतात. पण सर्वात मोठं आणि अपयशाची हमी देणारं कारण म्हणजे एखाद्या माणसाचा असा खंबीर निर्णय की जेवढं मला मिळेल त्यापेक्षा जास्त मी देणार नाही. जेवढे पैसे मला मिळतात त्यापेक्षा जास्त काम मी करणार नाही.

काही वर्षांपूर्वी एक माणूस असं म्हणताना माझ्या कानावर पडलं, 'मी तेवढंच काम करतो जेवढे मला पैसे मिळतात. थोडंही जास्त नाही' तो जोर देऊन म्हणत होता.

आजही मला तो माणूस कधी दिसतो. मला याचं आश्चर्य वाटत नाही की आजही तो तिथेच आहे, तसाच आहे.

सुदैवी आहे तो माणूस ज्याला प्राप्त करण्याचा खात्रीचा मार्ग सापडला आहे. तो मार्ग म्हणजे **देण्याचा**.

आपल्या क्षमतेप्रमाणे जगाला सर्वोत्तम देण्याचा विचार - त्या मोबदल्यात किती पैसे येतील या विचाराला थाराच नाही - ही आहे यशाची गुरूकिल्ली.

तुम्ही काय द्याल असं विचारू नका.
मी काय देऊ असं विचारा.

लक्षात ठेवा, प्रथम तुम्ही पेरता - आणि मग त्यानंतर तुम्ही कापणी करता.

तुम्हाला आयुष्यात तेवढंच मिळतं जेवढी किंमत तुम्ही मोजता. एक छोटीशी गोष्ट आहे जी कदाचित जास्त बोलकी आहे.

एक भोळाभाबडा माणूस बँकेत गेला. अगदी सरळपणाने त्याने म्हटलं, 'मला दहा हजार रुपये काढायचे आहेत. हजाराच्या दहा नोटा द्या. नसतील तर पाचशेच्या वीस नोटाही चालतील'.

कॅशियर म्हणाला, 'मला हसू आलं थोडं तर माफ करा पण कुठल्याच नोटा तुम्ही काढू शकत नाही. तुम्ही कधी पैसे जमाच केले नाहीत.

जास्त कापणी करण्यासाठी जास्त पेरणी करा.

प्रामाणिकपणा

चांगल्या कंपन्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवतात. आणि आपल्या लोकांकडूनही प्रामाणिकपणाचा आग्रह धरतात.

स्टारबक्स नावाची एक मोठी कॉफी कंपनी आहे. एकदा स्टारबक्सच्या मालकाला त्याच्या कर्मचाऱ्याने सुचवलं, जी कॉफी आपण ग्राहकाला विकतो ती बनवण्याच्या प्रक्रियेमधे जर आपण अगदी थोडीशी बचत केली तर आपण आपला नफा वाढवू शकतो. आणि ९० टक्के काय त्यापेक्षाही जास्त ग्राहकांना पत्ताच लागणार नाही.

स्टारबक्सचा मालक उत्तरला, 'पण मला पत्ता लागेल'.

'पैशासाठी काहीही' ही अपयशी लोकांची मानसिकता असते.

16
स्वतःमधेच आहे उत्तर

स्वत:ला बदलण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

एक छोटी गोष्ट आहे. शक्तीच्या रहस्यासंबंधी. देवांनी माणसाला बनवल्यानंतर ते या चिंतेने ग्रस्त झाले होते की माणसापासून शक्तीचं रहस्य कसं दूर ठेवायचं, जेणेकरून शक्तीचं रहस्य माणसाच्या हाती कधी लागणार नाही.

शक्तीचं हे रहस्य लपवण्यासाठी योग्य जागा निश्चित करण्यासाठी देवांनी सभा बोलावली.

एका देवाने सांगितलं, 'हे रहस्य आपण पृथ्वीवरील सर्वात उंच पर्वताच्या शिखरावर लपवून टाकू'.

दुसरा देव म्हणाला, 'नाही नाही. पर्वतावर नाही. माणूस जेव्हा आज नाही तर उद्या पर्वतांची शिखरे काबीज करेल त्याच्या हाती हे शक्तीचं रहस्य लागून जाईल. म्हणून पर्वताच्या शिखरापेक्षा समुद्राच्या तळाशी ठेवणं इष्ट आहे'.

तिसरा देव म्हणाला, 'काय फरक पडला? पर्वताच्या शिखरावर पोहोचणारा माणूस काय समुद्राच्या तळाशी पोहचू शकणार नाही. सर्वात बेस्ट तुम्ही हे रहस्य जमीनीत खोल गाडून टाका'.

योगायोगाने एक शहाणा अनुभवी देवही तिथे उपस्थित होता. त्याने म्हटलं, 'हे जे प्रस्ताव मांडण्यात आले आहेत - पर्वतावर किंवा समुद्रात ठेवण्याचे त्याने

आपला उद्देश साध्य होणार नाही. मी म्हणतो, हे शक्तीचं रहस्य तुम्ही स्वत: माणसाच्या मधेच ठेवून टाका. माणूस तिथे पाहणारच नाही. अशा प्रकारे शक्तीचं रहस्य कधी माणसाच्या हाती लागणार नाही'.

प्रस्ताव पारित झाला. आणि सभा आटोपली.

या काल्पनिक गोष्टीवरून शिकण्याची वास्तविक गोष्ट म्हणजे यशस्वी होण्यासाठी - पाहिजे ते मिळवण्यासाठी जे काही पाहिजे ते आपल्यामधेच आहे. त्यामुळेच तर यशाची हमी दिली जाऊ शकते.

असं शक्य आहे की एखादा माणूस पूर्ण आयुष्य दारिद्र्यामधे व्यतीत करू शकतो जेव्हा आयुष्यभर संपत्तीचे मोठमोठे साठे स्वत: त्याच्यामधे होते.

फक्त यामुळे की त्याला हे माहीत नव्हतं.

माणूस स्वत: आपल्या समस्यांसाठी, परिस्थितीसाठी जबाबदार असतो. माणसं बऱ्याचदा दुसऱ्यांना दोष यासाठी देतात की एक तर हे सोपं काम आहे. आणि दुसरं म्हणजे स्वत:ला दोष दिला तर मग काहीतरी करावं लागतं.

बऱ्याच लोकांना वाटतं त्यांच्या अडचणी आणि समस्यांचं कारण बाहेरील परिस्थिती किंवा दुसरे लोक

आहेत. त्यांना हे ऐकून धक्का बसतो आणि रागही येतो की ते स्वतः त्यांच्या परिस्थितीचे शिल्पकार आहेत. त्यांना वाटतं दुसऱ्यांनी बदलावं. जगाने बदलावं. नाहीतरी जगाला दुसरं काय काम आहे (असं त्यांना वाटतं).

पण उपाय या उलट आहे. स्वतःला बदलण्या-शिवाय दुसरा पर्याय नाही.

तुम्ही परिस्थितीचे बळी नाही. कुठल्या ना कुठल्या प्रकारे परिस्थितीसाठी तुम्ही जबाबदार आहात.

संधी

**आज जगात संधीचा तुटवडा नाही.
आजच्याइतकं संधीने भरगच्च जग
आधी कधीच नव्हतं.**

तुम्ही जिथे आहात तिथूनच तुमच्या यशाचा प्रवास सुरू होईल. संधी सर्वत्र आहे. अगदी सर्वत्र. प्रत्येक ठिकाणी.

जिकडे पहाल तिकडे आज संधी आहे. उदाहरणार्थ आज असे असंख्य लोकआहेत जे एक म्हणतात, दुसरं करतात. आम्ही सर्वात स्वस्त विकतो म्हणतील आणि महाग विकतील किंवा माणूस बघून किंमत सांगतील.

इथे तुम्हाला संधी आहे, स्वस्त विकतो असे जाहीर करण्याची आणि त्यापेक्षाही स्वस्त विकण्याची.

असे लोक आहेत ज्यांना फक्त कारण पाहिजे जास्त पैसे घेण्याचं. तुम्ही कारण शोधा कमी पैसे घेण्याचं.

अशा लोकांची नेहमीच गरज असते जे लोकांची गरज पूर्ण करू शकतात. रोज रोज नवीन नवीन शोध लागत आहेत. आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत देणाऱ्या माणसाची गरज आहे. देणाऱ्या माणसाची सर्वत्र गरज आहे. यशाची अमर्याद संधी देणाऱ्या माणसासाठी आज सगळीकडे उपलब्ध आहे.

प्रत्येक बाजूला देणाऱ्या माणसाची मागणी आहे. देण्याची एक आयडिया तुम्हाला अतिश्रीमंत करू शकते. पण काय देण्याची आयडिया?

दुसऱ्यापेक्षा जास्त देण्याची, दुसऱ्यापेक्षा स्वस्त देण्याची, दुसऱ्यापेक्षा लवकर देण्याची, दुसऱ्यापेक्षा चांगलं देण्याची.

कमी देण्याच्या आयडियेने तर सोडा दुसऱ्याइतकंच देण्याची आयडिया तुम्हाला पुढे नेणार नाही.

एखादा माणूस, एखादी कंपनी किंवा एखादे राष्ट्र जे कमी देण्याच्या बळावर पुढे गेले असं तुम्हाला दिसणार नाही.

जगाच्या इतिहासात आजच्या एवढी संधी कधीच नव्हती. म्हणून संधीच मिळत नाही असं एखाद्याचं म्हणणं जागेवरच खोटं ठरतं. खोटंच नाही तर असंबंधित सुद्धा. पण ही संधी त्यांच्यासाठी आहे जे घेण्याआधी देण्यासाठी तयार आहेत.

तुम्ही जर अपयशी लोकांना विचारलं त्यांच्या अपयशाचं रहस्य तर बहुतांश लोकं तुम्हाला सांगतील की संधीच येत नाही आहे त्यांच्याकडे. तुम्ही या लोकांचं जवळून निरीक्षण केलं तर तुमच्या लक्षात येईल की हे लोक दररोज एकापेक्षा एक चांगल्या संधीला परतावून लावत आहेत.

या जमान्यात अयशस्वी राहण्यासाठी कुठलीच सबब नाही.

संधी सर्वत्र आहे. डोके आणि डोळे उघडे ठेवून पाहण्याची गरज आहे.

पुस्तके वाचा. वृत्तपत्रे आणि मासिके वाचा. बाजारात जा. आजूबाजूला पहा. लोक काय विकत घेत आहेत, कुठल्या दुकानात गर्दी आहे. कुठल्या दुकानात शुकशुकाट आहे ते पहा. बसमधे, ट्रेनमधे, पार्ट्यांमधे लोक काय बोलत आहेत ते ऐका.

लोकांच्या चिंता, त्रास, अडचणी कानावर पडतात का पहा. फक्त ते काय बोलत आहेत तेवढंच नाही तर ते काय बोलत नाही आहेत तेही ऐका.

संधीच्या अमर्याद जंगलामधे तुमच्यासाठी कुठली संधी योग्य आहे हे तुम्हीच ठरवू शकता. तुम्ही कुठल्या क्षेत्रात आहात, तुम्ही कशाचे एक्स्पर्ट आहात, तुम्ही जगाला दुसऱ्यापेक्षा चांगलं काय देऊ शकता यावर ते अवलंबून आहे.

नेहमी लक्षात ठेवा. एक दार बंद झालं की दुसरं दार उघडलं. 'उघडतं' नाही - उघडलं. उघडण्यासाठी दुसरे दार तयार ठेवल्याशिवाय निसर्ग पहिले दार बंद करत नाही. ही अत्यंत गंभीर आणि अपवादरहित वस्तुस्थिती आहे.

संधी जेव्हा दिसते तेव्हा तिला ओळखून आणि तिचा फायदा घेऊन तुम्ही पराभवाला विजयात रूपांतरित करू शकता, तोट्याला नफ्यामधे आणि प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल परिस्थितीमधे बदलू शकता.

जिथे अपयशी लोकांना समस्या दिसतात तिथे यशाच्या मानसिकतेच्या लोकांना संधीची खाण दिसते.

कोणी तुम्हाला संधी आणून देण्याची वाट पाहू नका. तुम्ही स्वतः संधी निर्माण करा. जे तुमच्या सभोवती आहे त्यातच संधी दडलेली आहे.

नेहमी स्वतःला विचारा : माझ्या ग्राहकांना काय पाहिजे? त्यांना कशाची गरज आहे? त्यांच्या समस्या काय? दुसऱ्या कोणापेक्षाही अधिक चांगल्याप्रकारे मी कुठली गोष्ट देऊ शकतो?

मोठी संधी शोधत असाल तर लोकांची मोठी समस्या शोधा.

अपयशी माणसाला प्रत्येक संधीत अडचण दिसते,
यशस्वी माणसाला प्रत्येक अडचणीत संधी.

18 वेळ

वेळ आहे एकविसाव्या शतकाचं नाणं.

TEMPUS FUGIT.

हे लॅटिन भाषेचं वाक्य आहे. याचा अर्थ होतो:

वेळ धावत आहे.

जर समजा बँकेत तुमचा असा अकाउंट असला ज्यात रोज सकाळी एक ठरावीक रक्कम जमा होते - आपोआप. समजा १००० रुपये. पण हे पैसे तुम्हाला त्याच दिवशी वापरावे लागतात. कारण संध्याकाळी तुमचा अकाउंट परत झीरो होऊन जातो.

दुसऱ्या दिवशी सकाळी परत १००० रुपये तुमच्या खात्यात जमा होतात - आपोआप. यातले तुम्ही पूर्ण पैसे वापरून घ्या किंवा अर्धे वापरा किंवा नका वापरू, संध्याकाळी तुमचा बॅलन्स परत झीरो.

पुढच्या दिवशी सकाळी पुन्हा हजार रुपये - आपोआप आणि न चुकता. असा अकाउन्ट कोणाचा असला तर तो काय करेल? बहुतांश लोक काय करतील?

बहुतांश लोक यासाठी प्रयत्न करतील की पूर्ण नाही तरी जास्तीत जास्त पैसे आपल्याला वापरता यावेत, कारण उरलेली रक्कम दुसऱ्या दिवशी कामाला येत नाही.

मुळात असा अकाउंट प्रत्येकाचा असतो. पण पैशांचा नाही, वेळेचा.

रोज सकाळी आपल्या खात्यात २४ तास जमा केले जातात. आपण त्यातले किती का वापरत नाही, दिवसाच्या अखेरीस आपोआप अकाउंट बॅलन्स झीरो

होऊन जातो. आणि दुसऱ्या दिवशी सकाळी परत २४ तास खात्यात जमा होतात.

वेळ धावत आहे. वेळेचा पुरेपूर वापर करा.

वेळेचे व्यवस्थापन

वेळेचे व्यवस्थापन या विषयावर असंख्य पुस्तके बाजारात आहेत. तुम्हाला हवी असतील तर तुम्ही ती पुस्तके विकतही घेऊ शकता. पण त्यामुळे तुमचा खर्चही होईल आणि वाचण्यात वेळही जाईल. त्यापेक्षा अशा पुस्तकांचे सार मी तुम्हाला एका मिनिटात आणि एक्स्ट्रा पैसे न घेता सांगतो.

फार साधी माहिती आहे. पण हे पुस्तकच पूर्ण साधं आहे. त्यामुळे साध्याशिवाय दुसऱ्या कशाचीच अपेक्षा तुम्ही या पुस्तकातून करू शकत नाही.

वेळ व्यवस्थापनाची सर्वात प्रभावी पद्धत म्हणजे रोज रात्री दुसऱ्या दिवसाच्या कामांची यादी बनवणे. ही यादी महत्त्वाच्या क्रमानुसार लावणे. सर्वात महत्त्वाचं काम सर्वात पहिल्यांदा अशा प्रकारे.

मग दुसऱ्या दिवशी सकाळी काहीच विचार न करता लगेच पहिल्या कामाला हात घाला, काम संपेपर्यंत थांबू नका. मग दुसरं काम. मग तिसरं काम. अशाप्रकारे.

असं फक्त एक आठवडा करून पहा. नंतर तुम्ही नेहमी कराल.

बऱ्याचदा लोकांना उत्तरे सापडत नाहीत. कारण ते प्रश्नच विचारत नाहीत. उत्तरे हवी असतील तर नेहमी प्रश्न विचारा. खाली काही प्रश्न आहेत त्यांची उत्तरे गंभीरपणे दिल्यास एका दिवसात आपण किती वेळ वाया घालवतो त्याची कल्पना येऊ शकते.

प्रश्न : आज मी किती वेळ वाया घालवला?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी उपप्रश्न :

१) मी आणखी लवकर उठून आणखी लवकर काम सुरू करू शकलो असतो का?

२) माझ्याकडे कामांचे वेळापत्रक किंवा करावयाच्या कामांची यादी होती का?

३) नेमकं कुठे जायचं आणि नेमकं काय करायचं हे मला स्पष्टपणे माहीत होतं का?

४) इकडे तिकडे बसण्यात माझा किती वेळ गेला?

५) टेलिफोनवर मी अनावश्यक वेळ किती घालवला?

६) टीव्हीसमोर मी किती टाइमपास केला?

७) मी हो-नाही, हो-नाही करण्यात किती वेळ घालवला?

नेहमी स्वत:ला विचारा, ‘या क्षणी माझ्या वेळेचा सर्वात फायद्याचा उपयोग काय’?

या प्रश्नाचं कधीही फक्त एकच उत्तर असेल. या प्रश्नाचं वेळोवेळी अचूक उत्तर देण्याची आणि ताबडतोब त्या कामाला लागण्याची योग्यता तुमच्या यशस्वी होण्यात मोठी भूमिका बजावेल.

वेळेचं महत्त्व

शब्द वेगवेगळे - संदेश एकच

घड्याळ सतत धावत आहे.

मिनिटांची काळजी घ्या, तास स्वत:ची काळजी घेतील.

वेळ कोणासाठीच थांबत नाही.

गेलेली वेळ पुन्हा येत नाही.

वेळ जाण्याआधी वेळेची किंमत ओळखा.

वेळ वाया, आयुष्य वाया.

कुठलंही काम करताना पूर्ण वेळ फक्त तेच काम करा.

जीवन फारच लहान आहे. जेवढा कमी अपव्यय करता येईल तेवढा कमी अपव्यय करा.

वेळ तशीही निघूनच जाणार आहे. प्रश्न आहे तुम्ही त्याचा वापर कसा कराल.

वेळेला सहजपणे कधीच घेऊ नका. जगातील सर्व पैसे देऊन गेलेला एक क्षण परत मिळवला जाऊ शकत नाही.

यशस्वी लोकांना वेळेच्या मूल्याची तीक्ष्ण जाण असते.

परिस्थिती बदलायला एक क्षणही लागत नाही. कुठल्याही क्षणी परिस्थिती संपूर्णपणे वेगळी आणि अनपेक्षित होऊ शकते. अनुकूल परिस्थिती असेल तर स्वत:ला सुदैवी समजा. परमेश्वराचे आभार माना. ताबडतोब कामाला लागा.

काही विचार...

19 विचार करण्यासाठी

माणसाला खाली आणणारा गर्वापेक्षा
वेगवान मार्ग नाही.

तुम्ही नर्कातून जात असाल तर चालणं सुरू ठेवा.
नर्कातून बाहेर पडण्याचा हा एकच मार्ग आहे.

मोठी स्वप्ने पहा. कारण मोठी स्वप्नेच माणसाचं रक्त
ढवळू शकतात.

स्वप्न पाहतच असाल तर मोठंच पहा.
लहान कशाला?

सोपी होण्याआधी कुठलीही गोष्ट कठीण असते.

जो खूपच सुरक्षित आहे तो असुरक्षित आहे.

काय शोध लावतील ते लोक जे समुद्रात असताना
जमीन दिसत नसल्यामुळे असे ठरवून टाकतात की
जमीन कुठेच नाही.

एकाच वेळेस दोन कामं करणे म्हणजे दोनपैकी
एकही काम न करणे.

जे हृदयापासून निघतं, ते हृदयाला जाऊन भिडतं.

चालता आणि धावता येण्याआधी माणसाला
रांगावं लागतं.

यशस्वी ते होतात जे निराश करणाऱ्या
परिस्थितीला महत्त्व देत नाहीत.

अपयशाचा खात्रीचा मार्ग :
भेटेल त्या प्रत्येकाला खुश करण्याचा प्रयत्न करा.

कुठलंही काम शक्य तेवढं चांगलं करा, आणि
जेवढं तुम्ही घेता त्यापेक्षा जास्त द्या.....नेहमी.

- Martina Navratilova

लोक पोहायला शिकू इच्छितात पण त्याचवेळेस एक पाय जमिनीवरही ठेवू इच्छितात.

काम उद्यावर ढकलणे क्रेडिट कार्ड वापरण्यासारखे आहे. बिल मिळेपर्यंत फार मजा येते.

यशाचे सूत्र : छोटा शब्द द्या. मोठी पूर्तता करा.

अतिशयोक्तिपूर्ण शब्द कधीच देऊ नका.

आपल्या स्थितीसाठी आपली परिस्थिती दोषी नाही. आपणच आहोत.

यंत्रांनी कामे करायला पाहिजे. माणसांनी विचार करायला पाहिजे.

- IBM चे घोषवाक्य

ज्ञानाला अर्थ कृतीमुळे प्राप्त होतो.
कृती नाही तर ज्ञानाला अर्थ नाही.

20

आता कामाला लागा

अभिनंदन तुमचं. तुम्ही आरंभाला येऊन पोहोचले. शेवट हा आरंभच आहे. पुस्तकाचा शेवट आणि कामाचा आरंभ. आता पुस्तक ठेवून द्या, आणि लागा कामाला.

आता वेळ आली आहे काम करण्याची - आणि यशाच्या खात्रीने करण्याची. जसं मी तुम्हाला मधे मधे सांगितलं की कृतीला महत्त्व आहे. केवळ माहितीला नाही. जसं ते लोक म्हणतात उक्तीपेक्षा कृती श्रेष्ठ. पण मी तुम्हाला सांगतो उक्तीपेक्षा कृती श्रेष्ठ नाही. जी आहे ती फक्त कृतीच. बाकी काहीच नाही.

इथपर्यंत आपण एकत्र आलो. इथून किती पुढे तुम्ही जाणार हा तुमचा निर्णय आहे. आपण अशा अविश्वसनीय युगात राहतो जिथे प्रत्येकाला यशाची संधी उपलब्ध आहे.

मी पुस्तक लिहिलं. तुम्ही ते वाचलं. एका प्रकारे ही सामान्य गोष्ट आहे. पण सध्याच्या परिस्थितीत ही सामान्य घटना नाही. कारण हे पुस्तक तुम्ही वाचणं आणि तेही शेवटापर्यंत हा तुमच्या यशस्वी होण्याच्या निर्णयाचा पुरावा आहे.

यशस्वी होण्याची इच्छा किंवा यशस्वी होण्याचा विचार तुमच्या मनात नसता तर हे पुस्तक तुम्ही वाचणं तर

सोडा विकतही घेतलं नसतं.

यशस्वी होण्यासाठी लागणारं सगळं काही आता तुमच्याजवळ आहे. फक्त कामाला लागण्याची गरज आहे.

मी तुम्हाला मोठं यश चिंततो, जरी मला माहीत आहे केवळ चिंतण्याने कोणाला यश मिळत नाही.

पण तरीही मी तुम्हाला यश चिंततो आणि तेही मोठं. कारण हे औपचारिक चिंतणं नाही. कारण ज्या यशाबद्दल मी बोलतोय ते योगायोगाने मिळणारं यश नाही, खात्रीने मिळणारं आहे. जे मिळण्याआधी सुद्धा अनुभवलं जाऊ शकतं. तर लागा कामाला आणि घडवून आणा यश - मोठं.

तुम्हाला यशासाठी शुभेच्छा आणि नमस्कार.

तुमची प्रतिक्रिया अवश्य कळवा

हे छोटंसं पुस्तक तुमच्या सेवेत सादर करण्यामागे कारण असं होतं की मला वाटलं आधीच उशीर झाला. कारण गेली काही वर्षे हे पुस्तक माझ्या डोक्यात होतं. म्हणून एकदाचं ठरवलं आणि लगेच लिहिलं. मागच्या आठवड्यातच हे पुस्तक मी लिहिलं.

आता सुरुवात झाली आहे तर या विषयावरील आणखी पुस्तके मी तुमच्या सेवेत वेळोवेळी सादर करेन. तुम्हाला या पुस्तकामुळे जर थोडाही किंवा कसलाही फायदा झाला तर त्यापेक्षा आनंदाची गोष्ट दुसरी काय?

शिवाय तुम्हाला कधीही जर वाटलं की पुढच्या पुस्तकात अमुक गोष्टीचा समावेश झाल्यास पुस्तकाची उपयुक्तता वाढेल तर तुम्ही मला कधीही पत्र लिहून सांगू शकता.

तुमची प्रतिक्रिया, तुमचे विचार, तुमचे प्रश्न निमंत्रित आहेत.

धन्यवाद.

अब्दुस्सलाम चाऊस

नागपूर

१८-९-०८

पत्ता:

C/o Think Book Shop, Jafar Nagar Masjid Complex, 110, Jafar Nagar, Nagpur. Pin Code - 440013.

लेखकाची अन्य पुस्तके :

१. **इंग्रजीमधे बोला पटकन**

इंग्रजी शिकवणारे क्रांतिकारी पुस्तक

२. **शब्दांवर प्रभुत्व मिळवा**

शब्दांच्या अडचणी समूळ नष्ट करणारे अद्वितीय पुस्तक

३. **चाऊस डिक्शनरी**

महाराष्ट्राची पहिली अस्सल मराठी-इंग्रजी डिक्शनरी

हालवणारं उठवणारं ढकलणारं

यशस्वी होण्याचे नैसर्गिक नियम शिकवणारं,
यशस्वी होणं इतकं सोपं आहे हे दाखवणारं,
प्रेरणा देणाऱ्या शक्तिशाली विचारांनी
भरगच्च असं महाराष्ट्राचं
पहिलं पुस्तक

यशशास्त्र

पुस्तक छोटंसं, पण इतकं परिणामकारक.....
या पुस्तकाच्या साहाय्याने वाटेतील अपयशांना,
अडथळ्यांना आणि कठीण परिस्थितींना
पायदळी तुडवत तुम्ही थेट तुमच्या
ध्येयापर्यंत पोहचू शकता.

किंमत फक्त
५० रुपये

salaamchaus
The business of GIVING